नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

७

मा. ज. कानेटकर
श्री. के. बोबडे
मनोहर म. देशपांडे
दत्तात्रेय कुळकर्णी
सुरेश श्रीधर भट
राम शेवाळकर
सुरेश डोळके
बाळ गंगाधर देव
पां. कृ. सावळापूरकर
राम डोके
माधव गोपाळ जामदार

या शिवाय

संघवार्ता इत्यादि

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वती जन्मभू

आगष्ट १९५३

किंमत आठ आ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] ऑगस्ट १९५२ [अंक ५ वा

अनुक्रमणिका

लेख	पृष्ठ
१. संपादकीय	१
राजभाषा अधिनियम	
विभिन्न भाषिकांना मराठीची ओळख	
ग्रंथालयांतील न वाचले जाणारे ग्रंथ	
अधिकाऱ्यांच्या जीवनांत रस आणण्याचे सरकारी प्रयत्न	
लोकमान्यांचें पुण्यस्मरण	
कै. वामन मल्हार जोशी	
कै. प्राणाचार्य पुरुषोतमशास्त्री हिर्लेकर	
२. कला : परीक्षा आणि पथ्य	६
३. शाप (लघुकथा)	९
४. कांही कविता	११
दुपार	
सांज	
रिता	
रेशमी जळांत	
आम्ही रावणारे हात !	
जागृती––	
––प्रीतिदेवते	
नाही अजुनी मर्म गवसलें	
५. गडकऱ्यांचीं प्रेमगीतें	१६
६. आईचं ऋण (लघुकथा)	१९
७. 'नववधू प्रिया मी––' (रसग्रहण)	२४
८. संघवार्ता	२८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

▌ ८ वें   आगष्ट १९५३   अंक ५ वा

सं पा द की य

·ज भाषा अधिनियम

ता. १५ आगष्ट १९५३ रोजीं राजभाषा धिनियम मध्यप्रदेशांत अमलांत आणण्यासंबंधी जी पणा मुख्य मंत्री, पं. रविशंकर शुक्ल, यांनी केली तीं, तिची पूर्वतयारी सध्या जोरांत सुरू असल्याचें ज्जतें. हा अधिनियम अमलांत आणण्यापूर्वी मराठी षेला न्याय्य स्थान मिळण्याच्या दृष्टीने त्यांत जरूर । दुरुस्त्या कराव्यात, अशी जी मागणी विदर्भ हित्य संघाच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने ता. १७–३–३ रोजीं मुख्य मंत्र्यांना भेटून केली होती, तिच्या-बंधी मात्र कांहीच खुलासा अजून सरकारकडून रण्यांत आलेला नाही. वस्तुतः मुख्य मंत्र्यांनी ष्टमंडळाला जें सहानुभूतिपूर्ण आश्वासन या मुला-तींत दिलें होतें, तें लक्षांत घेतां, आतापर्यंत राजभाषा धिनियमांत मराठीच्या दृष्टीने आपण काय दुरुस्त्या रणार आहोंत, हें जाहीर करणें, हें सरकारचें कर्तव्य तें. पण सरकारला अजून त्याची जाणीव झाल्याचें सत नाही. ही परिस्थिति लक्षांत घेऊन, राजभाषा धिनियम समितीचे आमंत्रक, श्री. माडखोलकर नी ता. २९ जून १९५३ रोजीं मुख्य मंत्र्यांना पत्र हून त्यांनी शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनाचें रण त्यांना दिलें, व सरकार या बाबतींत काय रीत आहे, हें विदर्भ साहित्य संघाला कळविण्यांत वें अशीहि विनंती त्यांना केली. पण या पत्राची सुद्धा नुसती पोंच देण्यापलीकडे सरकारने अधिक दखल घेण्याची दक्षता दाखविलेली नाही. अर्थात् मध्यप्रदेश विधानसभेच्या येत्या अधिवेशनांत राजभाषा विधेय-काची दुरुस्ती सुचविणारें बिल पुनः आणण्यांत येईल असा प्रयत्न करणें, आता समितीला प्राप्त आहे.

✻

विभिन्न भाषिकांना मराठीची ओळख

भारतास स्वतंत्रता प्राप्त झाल्यापासून राष्ट्रभाषा हिंदींतून (व क्वचित् इंग्रजींतून) निरनिराळ्या भाषां-तील साहित्य व कलांचा परिचय करून देण्याच्या प्रयत्नास जोराने चालना मिळाली आहे. भिन्न भाषिक राज्यें असलेल्या या भारतांत आजच्या घटकेला भाषिक वैमनस्यें व गैरसमज यांना नुसता ऊत आलेला आहे. हीं वैमनस्यें भाषावार राज्यनिर्मितीनंतरच पूर्णतः नाहीशीं होतील यांत संशय नाही. परंतु तोंवर सर्वसाधारण जनतेंत भिन्नभाषिकांबद्दल उपेक्षा व तिरस्कार निर्माण करण्याच्या पद्धतशीर प्रयत्नास आळा घालणें जनतेच्या एकजुटीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक झालें आहे !

कला आणि साहित्यांत ती ती भाषा बोलणाऱ्या जनतेची जीवनदृष्टि, आकांक्षा व ध्येयें, व्यक्तित्व आणि हृद्गत प्रकट होत असतें आणि आपआपल्या भाषेंतील कला व वाङ्मयाची विभिन्न भाषिकांस उत्तम रीतीने ओळख करून दिल्यास त्या कलाकृतींच्या माध्यमाने ती भाषा बोलणाऱ्या माणसांच्या व्यक्तित्वाची व हृद्गताची ओळख भिन्नभाषिकास पटून परस्पर ऐक्यो-प्याची व स्नेहाची भावना वाढीस लागते. तेव्हा निरनिराळ्या भाषांमधील कलाकृतींची ओळख करून देण्याचें हें कार्य किती महत्त्वाचें आहे हें निराळें सांगा-वयास नको; व त्या दृष्टीने या कार्यास अलिकडे जी जोराने चालना मिळाली आहे ती अत्यंत आवश्यक व स्वागतार्ह आहे असें कोणीहि म्हणेल.

परंतु कलावाङ्मयाचा परिचय करून देण्याचें हें कार्य वरील हेतु लक्षांत न घेतां अपुऱ्या जाणिवेने घिसाड घाईत कसें तरी केल्यास इष्ट हेतु साध्य न होतां त्याचा उलट परिणामहि होऊं शकतो आणि दुर्दैवाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अलिकडे मराठी काव्य व कलेसंबंधी जे लेख हिंदी अथवा इंग्रजींतून येत आहेत ते अशाच प्रकारचे आहेत. श्री. प्रभाकर माचवे यांनी गेलीं अनेक वर्षे मराठी साहित्य व कलेचा हिन्दी भाषाभाषी जनतेस परिचय करून देण्याची कामगिरी यथामति बजावली आहे. कवि अनिल व मर्ढेकर यांची ओळख त्यांच्या लेखांमुळेच हिंदीभाषी जनतेस झाली आहे. त्यांच्या या कार्याचें ऋण अमान्य करतां येणार नाही. परंतु अलिकडे भारत सरकारच्या पब्लिकेशन्स डिविजन कडून प्रसिद्ध होणाऱ्या 'आजकल' या प्रमुख हिंदी मासिकांत आलेला त्यांचा लेख मात्र मराठी काव्यासंबंधींच्या चुकीच्या विधानांनी भरलेला आहे असें खेदानें म्हणावें लागतें.

तसेंच त्याच अंकांत कांही मराठी कवींच्या कवितांचा अनुवाद छापलेला आहे. त्यांतून कुसुमाग्रज, पु. शि. रेगे यांसारख्या प्रमुख कवींना वगळण्यांत आलेलें आहे आणि कांही कवितांचा अर्थ लागणेंहि कठिण व्हावें इतक्या निष्काळजीपणानें अनुवाद करण्यांत आलेला आहे.

दुसरें एक उदाहरण मौज साप्ताहिकानें प्रसिद्ध केलें आहे. श्री. इंदर दास नांवाच्या गृहस्थांनी कर्टन कॉल मासिकांत भारतीय रंगभूमीसंबंधी एक लेख लिहिलेला आहे आणि त्यांत मराठी रंगभूमीबद्दल खालीलप्रकारचें विधान आहे. " The Marathi stage is mainly in the hands of old style actors whose acting lies in good singing. There is too much emphasis on cheap slapstick, domestic comedy and on heavy gesticulation. (संगीतालाच अभिनय मानणाऱ्या जुन्या नटांचेंच मराठी रंगभूमीवर प्रावल्य असून विदूषकी हातवारे व राणा भीमदेवी आविर्भाव म्हणजेच अभिनय अशी बहुतेकांची समजूत आहे.)

आधुनिक मराठी रंगभूमीशीं यत्किंचित् परिचय असणाऱ्या कोणाहि माणसास हें विधान किती चुकीचें आहे हें सहज कळून येईल. मराठी भाषेची व कलेची अशी बदनामी चालू राहिल्यास तें मराठी भाषेला व जनतेला हानिकारक झाल्याशिवाय राहणार नाही.

ही बदनामी व हानि टाळावयाची असल्यास मराठी रसिकांनी कोठे काय प्रसिद्ध होतें यासंबंधी अतिशय जागरूक राहणें आवश्यक आहे. तसेंच दोन्ही भाषांच्या प्रकृति आणि वृत्ति जाणणाऱ्या मराठी साहित्यिकांनी व कलावंतांनी या प्रश्नाची भूमिका व महत्त्व लक्षांत घेऊन त्या दिशेने प्रयत्न केल्यास अशा प्रकारच्या चुका राहण्याचा संभव टळेल.

*

ग्रंथालयांतील न वाचले जाणारे ग्रंथ

वर्तमानपत्राच्या वाचकांनी कांही दिवसांपूर्वी वाचलें असेल की, मुंबईच्या 'रॉयल एशिआटिक सोसायटी'च्या वाचनालयांत सुमारें ५०००० ग्रंथ अनेक वर्षे न वाचले जातां तसेच पडून आहेत. तेव्हा या महत्त्वाच्या ग्रंथांचें वाचन केलें जाईल अशा प्रकारची कांहीतरी तरतूद करणें अवश्य आहे. फार दूर कशाला जायला पाहिजे ? नागपूरच्या सुप्रसिद्ध 'राजाराम वाचनालया'च्या कार्यकर्त्यांशीं कांही दिवसांपूर्वी गोष्टी करितांना हाच अनुभव त्यांनी सांगितला. वाचकांसाठी नवीन नवीन पुस्तकें घेणें हें जसें वाचनालयाचें कार्य आहे, तसेंच पूर्वी घेतलेलीं पुस्तकें वाचकांकडून वाचवून घेणें हेंहि अशा संस्थांचें कार्य आहे. ग्रंथ वाचले जात नाहीत म्हणजे ते वाचनाच्या योग्यतेचे नसावेत असा तर्क करणें सुसंगत होणार नाही. न वाचल्या जाणाऱ्या ग्रंथांच्या यादीकडे वाचनालयाच्या विद्वान वाचकांनी लक्ष दिल्यास वरील म्हणणें त्यांना पटेल. तेव्हा ग्रंथांवरील केवळ नांवांमुळे वाचकांना ग्रंथांविषयी आकर्षण उत्पन्न होत नाही हें त्यांतील महत्वाचें कारण आहे, हें उघड आहे. यासाठी त्या त्या ग्रंथांची थोडक्यांत ओळख करून देणारें लहानसें टिपण सामान्य वाचकांकरिता करून द्यावें व वाचनालयाच्या या कार्यांत विद्वानांनी हातभार लावावा अशा हेतूनें कार्यकर्त्यांनी दोन ग्रंथ नमुन्यासाठी म्हणून 'युगवाणी'कडे पाठविले आहेत.

कुरल काव्य गेलीं सात वर्षे वाचनालयाच्या कपाटांत पडून आहे. कुरल हें प्राचीन तामील भाषेंतील सुंदर काव्य असून, त्याचा मराठी गद्य अनुवाद प्रस्तुत ग्रंथांत केलेला आहे. 'कुरल' नांवाच्या तामील वृत्ताची योजना केल्यामुळे काव्यालाहि तेंच नांव ठेवलें आहे. या वृत्तांत पहिलें चरण चार पदांचें व दुसरें तीन पदांचें असून, सात पदांच्या मर्यादेंत थोर विचार गोंवलेले आहेत. पहिल्या चरणाचा शेवट व दुसऱ्या चरणाचा आरंभ यांत यमकाची कौशल्यपूर्ण योजना 'कुरल' वृत्तांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असते. या ग्रंथांत एकंदर ११३ प्रकरणें असून प्रत्येकांत १० श्लोक आहेत. भाषांतर गद्य असल्याने मूळ ग्रंथांतील 'यमका'चा आस्वाद वाचकांना मिळत नाही. तथापि पुस्तकाची भाषा सुबोध असल्याने ग्रंथ वाचनीय झाला आहे. 'लोकप्रिय नसलेल्या माणसाचें वैभव म्हणजे गांवांतच असलेल्या विषवृक्षास आलेला फलभार होय' अशासारखीं सुंदर भाषेच्या कोंदणांत बसविलेलीं विचाररत्नें, या ग्रंथांत पदोपदीं चमकतांना दिसतात. प्रास्ताविक विवेचन झाल्यावर, मुख्य ग्रंथाची विभागणी तीन भागांत केली आहे; पहिला भाग धर्मशीलता, दुसरा संपत्ति व तिसरा प्रेम. धर्मशीलतेमध्ये गृहस्थजीवन व तपस्वीजीवन असे विभाग असून गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें, सहचारिणीचें जीवितध्येय यांना विशेष महत्त्व दिलें आहे. मुनिजीवनांत संयम, ज्ञान व दया यांची महती वर्णिली आहे. दुसऱ्या विभागांत अर्थ म्हणजे संपत्ति याविषयी विवेचन असून, राजा व राजतंत्र यांची मीमांसा, 'कौटिलिय अर्थशास्त्रा'च्या धर्तीवर केली आहे. तिसऱ्यांत प्रेमाचें विवेचन आहे, पण तो भाग प्रस्तुत भाषांतरांत आलेला नाही. ग्रंथाचे कर्ते श्रीमान् कुंदकुंदाचार्य हे जैन सांप्रदायांतील महान आचार्य असून ते इ. स. पूर्वी १२५–१५० वर्षे तरी होऊन गेले असें विद्वानांचें म्हणणें आहे. 'कुरल' हें काव्य दक्षिण भारतांत 'मदुरें'तील कवींच्या विद्यापीठांत 'उग्रपेरु वलुडी' नांवाच्या पांड्यवंशीय राजाच्या राजवटींत निर्माण झालें. या काव्यांतील वचनांचा उपयोग पुढे अनेक जैन ग्रंथकारांनी केलेला असून, या संबंधी विशेष असा की यांतील नीतितत्त्वांचें विवेचन इतकें व्यापक व उदात्त आहे की जैन, बौद्ध, हिंदु व ख्रिश्चन या सर्वधर्मीयांनी ह्या काव्याचे कर्ते कुंदकुंदाचार्य यांच्या 'कुरल' काव्यांत आमच्याच सांप्रदायाचें उत्तम प्रतिबिंब पडलें आहे असें अहमहमिकेने म्हटलें आहे. तथापि संशोधकांच्या म्हणण्याप्रमाणे श्वेतांबर व दिगंबर असे दोन विभाग जैन सांप्रदायांत उत्पन्न होण्यापूर्वी हा ग्रंथ निर्माण झाला असावा.

'कुरल' हें तामिल काव्य जगन्मान्य झालें असल्याने, अनेक पाश्चात्य भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं आहेत. त्यांतील शिकवण 'सार्वधर्मीय' असल्याने व उत्कृष्ट उपमादृष्टान्तांनी तें नटलें असल्याने तें लोकप्रिय झालें आहे. जैन धर्मीयांना मराठी भाषेंतील हा ग्रंथ मोलाचा वाटेल यांत शंका नाही; त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीच्या दृष्टीनेहि या ग्रंथाचें महत्त्व श्रेष्ठ दर्जाचें आहे. ग्रंथ सरळ, सुबोध मराठी गद्यांत असल्याने वाचकांनी जर हा ग्रंथ चाळला तरी त्यांच्या श्रमाचें चीज होईल. प्रो. चक्रवर्ती यांच्या प्रस्तावनेचा, आरंभीं दिलेला मराठींतील अनुवाद, संशोधक व चिकित्सक दृष्टीच्या वाचकांना महत्त्वाचा वाटेल.

पंडित रंगाचार्य रड्डी यांचा लेखसंग्रह वाचनालयांत दहा वर्षे पडून आहे. पंडित रंगाचार्य यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संस्कृत मराठी विविध लेखांचा संग्रह त्यावेळीं प्रकाशित झाला होता. बुद्धीचा चौरसपणा, संशोधनाची हौस, संस्कृत विद्या व भाषा यांचा अभिमान, गाढ विद्वत्ता, संस्कृत व मराठी भाषेवरील त्यांचें प्रेम व प्रभुत्व इत्यादि त्यांचे अंगीं असलेल्या अनेक गुणांची ओळख, त्यांच्या निरनिराळ्या लेखांवरून वाचकांना होईल. प्रि. नानासाहेब मिराशी यांचा 'कालिदास', श्रीयुत प्रियोळकर यांनी प्रकाशित केलेलें 'नलदमयंती स्वयंवर', या ग्रंथांवरील त्यांनी केलेली चर्चा व रसग्रहण इतकें समतोल, उद्बोधक व मार्मिक आहे की उत्कृष्ट टीकाकार व समीक्षणकार होऊं इच्छिणाऱ्यांनी त्याचें अवश्य मनन करावें. 'मराठी व्याकरण परिषदे'च्या प्रसंगींचें भाषणहि त्यांच्या विद्वत्तेला, रसिकतेकला व प्रसंगाला साजेल असेंच आहे. त्यांची संस्कृत भाषाशैली देखील हृदयंगम व सुबोध असून, त्यांची मांडणी व विचार सुस्पष्ट व रेखीव आहेत. लेखांच्या यादीकडे नजर टाकल्यास, पंडित रंगाचार्य रड्डी हे कोणत्या तोलाचे पंडित होते हें वाचकांना सहज कळून येईल. पान ६२ ते १३४ हा भाग सामान्य वाचकांना देखील मार्मिकपणाची व रसिकपणाची मेजवानी वाटेल. ग्रंथांचें परीक्षण करतांना, रसिकपणाने ग्रंथांतील मार्मिक स्थळें वाचकांच्या नजरेला आणून, ग्रंथलेखकाचें दोषदर्शनहि कसें नाजुक रीतीने करतां येतें, याचा प्रत्यय पदोपदीं या ग्रंथांत वाचकांना येईल. मराठींतील नूतन टीकाकार आणि समीक्षक या ग्रंथाकडे नजर देतील अशी आशा आहे.

*

अधिकाऱ्यांच्या जीवनांत रस आणण्याचे सरकारी प्रयत्न

गेल्या महिन्यांत असें वाचनांत आलें की मध्यप्रदेश सरकार राज्यांतील कांही भागांतील क्लबांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

द्रव्यसहाय्य करणार आहे. बस्तर, कांकेर इत्यादि संस्थानें विलीन झाल्यावर तेथील आमोद-प्रमोदाचीं स्थळेंहि पुष्कळशीं लीन झालीं. त्याचा परिणाम असा झाला की त्या भागांत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना 'आपली संध्याकाळ कशी घालवावी' हें कळेनासें झालें. दिवसभराच्या कामानंतर आवश्यक ठरणाऱ्या आरामास मुकलेल्या या बिचाऱ्या अधिकाऱ्यांची सरकारला कीव यावी हें सरकारच्या सहृदयतेचें लक्षण नव्हे काय ? सध्या द्रव्याभावीं मोडकळीस आलेल्या क्लबांचें पुनरुज्जीवन करण्याचा सरकारी विचार स्तुत्य नाही असें कोण म्हणेल ? पण या संबंधांत कांही विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहीत.

संध्याकाळीं चार घटका क्रीडेंत किंवा करमणुकींत घालवण्यांत कांही गैर नाही. कित्येकदा तर कांही तरी मनोविनोदन स्नानासारखें अत्यावश्यक असतें. परंतु स्वतःच्या मनोविनोदनाची सोय सरकारी अधिकारी करूं शकत नाहीत हें कशाचें द्योतक आहे?— त्यांच्या काल्पनिक दारिद्र्याचें की संघटनकौशल्याच्या अभावाचें ? जिल्ह्याचा अगर तहसिलीचा कारभार चालवणाऱ्या अधिकाऱ्यांना स्वतःचा क्लब चालवितां येऊं नये ही गोष्ट फारशी पटत नाही. मध्यम वर्गांतील त्यांतल्या त्यांत सुस्थित लोकांची जर ही गत आहे तर इतरांनी काय करावें ? हा झाला एक विचार. दुसरा विचार असा की या क्लबांत करतात तरी काय ? स्वतःचें मनोरंजन स्वतःला वाटेल त्या रीतीनें करण्याचा अधिकार प्रत्येकाला एका मर्यादेपर्यंत आहे यांत शंकाच नाही. वैयक्तिक वर्तनाची छाननी करण्याच्या दृष्टीनें नव्हे तर सामाजिक दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करायला हवा. बहुतेक क्लबांतून आता खेळ बसत चालले आहेत. जे काय खेळ खेळले जात असतील ते उघड्या मैदानांतून उठून आंतल्या खोल्यांकडे वळूं लागले आहेत. शारीरिक श्रम नकोत तर नकोत, पण कांही बौद्धिक वातावरण तरी हवेंच ! पण तेंहि अतिशय विरळ होत चाललें आहे. या आंतल्या खोल्यांतील चर्चा म्हणजे दिवसा केलेल्या सरकारी कामाच्या शिळ्या कढीला आलेला नवा ऊत. एखाद्या अधिकाऱ्याचा अपवाद सोडला तर प्रत्येकजण 'आपल्या दुकानासंबंधीच बोलत' असतो. (आंग्लविद्याविभूषित अधिकाऱ्यांना हें talking shop चें भाषांतर सहज कळावें.) एखाद्या क्लबांत वाचनालय चुकून असलेंच तर तें पुराणग्रंथसंग्रहालयासारखें असतें. एके काळच्या बुद्धिमान आणि उत्साही विद्यार्थ्यांवर अधिकारपदावर जातांच इतका जंग चढावा हें अतिशय खेदजनक आहे. वकिली, नोकरी, व्यापार इत्यादींत यशस्वी ठरलेल्या किती जणांना विश्वविद्यालयांत मिळालेल्या उत्तम अभिरुचीची आठवण राहते आणि त्यांच्यापैकी किती जणांची रसिकता सवंग कादंबऱ्या, सवंग बोलपट आणि सवंग संगीत, चहाटळ गप्पागोष्टी यांच्यापुढे जाऊं शकते ? अशा आशयाचे एका सुप्रसिद्ध इंग्रज लेखकाचे उद्‌गार या संदर्भांत आठवतात. " How many thousands of barristers, civil servants, and men of business, who left Oxford and Cambridge equipped to relish the best, have become, after thirty years of steady success, incapable of enjoying anything better than a little tipsy lust or sentimental friendship, cheap novels, cheaper pictures, vulgar music, the movies, golf, smoking-room stories and laying down the law ? " क्रीडा, साहित्य, संगीत, लहानमोठ्या प्रतिष्ठेची व सत्तेच्या भिंती ओलांडणारें, मनोरंजन इत्यादींचें एक लहानसें केंद्र आपापल्या शहरापुरतें किंवा गावापुरतें निर्माण करण्याचें कार्य सरकारी अधिकारी करूं शकतील. तसें झालें तरच सरकारच्या आर्थिक मदतीला कांही तरी अर्थ येईल.

*

लोकमान्यांचें पुण्यस्मरण

ता. ३१ जुलै १९२० रोजीं रात्रीं १२ वाजून ४० मिनिटांनी लोकमान्य टिळकांची इहलोकची यात्रा संपली आणि ता. १ आगष्ट १९२० रोजीं महात्मा गांधींनी असहकारितेचें रणशिंग फुंकलें. 'राष्ट्रीय असंतोषाचा जनक' एक तेजोगोल अस्तंगत होत होता, तर त्याच सुमारास त्याहूनहि अधिक प्रक्षोभक दुसरा तेजोगोल राजकीय क्षितिजाच्या दुसऱ्या बाजूला उदय पावत होता. तेजोगोलांच्या अस्तोदयांचा हा विलक्षण योगायोग, हें अपूर्व दृश्य, अगदी अविस्मरणीय आहे यांत शंका नाही. आपण ज्या 'स्वराज्यसिद्धी'साठी इतकी चळवळ केली, तिचें फळ भारताच्या पदरांत पडलेलें पाहून, लोकमान्यांच्या आत्म्याला अत्यंत समाधान झालें असेल.

२. स्वराज्य मिळालें, पण अजून 'सुराज्य' पदवीला तें पोचावयाचें आहे. लोकमान्यांना दिवंगत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होऊन तेहतीस वर्षांचा काळ गेला असल्याने, परिस्थितींत झपाट्याने पालट होत गेला आहे, आणि त्या वेळच्या कांही प्रश्नांना 'नवीन मूल्यें' प्राप्त झालीं आहेत. 'आधी सामाजिक की राजकीय?' हा वाद घालत बसण्याचें कांही कारण उरलें नसून, ज्याने त्याने आपल्या सामर्थ्याप्रमाणे स्वराज्यसंघटनेच्या गोवर्धन पर्वताला सर्वतोपरी उचलून धरावयाचें आहे. राष्ट्राचीं अनेक अंगें अजून उत्कृष्टपणें पोसावयाचीं आहेत. कामाची उणीव नसून कर्मयोग्यांची उणीव जोराने भासत आहे. कार्याचीं नवीन नवीन क्षितिजें निर्माण होत आहेत. अशा वेळीं 'गीतारहस्य' ग्रंथांत वर्णिलेल्या ज्ञानपूर्वक भक्तियुक्त कर्मयोगाची शिकवण आचरणांत आणण्याची सुवर्णसंधि आली असून, आपआपल्या वळाप्रमाणे व बुद्धिप्रमाणे कार्याची निवड करून, तें एकनिष्ठेने प्रत्यक्षपणें अंमलांत आणण्यासाठी झटावयाचें आहे. या पवित्र दिवशीं लोकमान्यांचें पुण्यस्मरण करून कांही तरी राष्ट्रीय सेवा करण्याचा निर्धार आपण आपल्या मनाशीं करूं या.

*

कै. वामन मल्हार जोशी

मराठी साहित्यांत वामन मल्हार जोशी यांचें स्थान अनन्य आहे. त्यांनी निर्माण केलेलें साहित्य वैशिष्टयपूर्ण आहे. 'आश्रमहरिणी'पासून 'इंदु काळे, सरला भोळे' या कादंबरीपावेतों जर आढावा घेतला, वामनरावांच्या कादंबरीसाहित्याच्या विकासाची रूपरेखा पाहिली, तर कादंबरीचा विषय आणि कादंबरीचें रूप यांच्यामध्ये कितीतरी स्थित्यंतरें झालेलीं दिसून येतील. त्यांनी नवीन नवीन विषय हाताळले. कारण निरनिराळ्या काळीं नवीननवीन समस्यांविषयी त्यांना जिव्हाळा वाटला आणि नवीननवीन लेखनपद्धतीचे प्रयोग त्यांनी करून पाहिले. वयोमान पालटत असतांहि अंतःकरण सजीव कुतूहलपूर्ण राहिलें म्हणून. वामनरावांनी तत्त्वज्ञानाचा खोलवर अभ्यास केला होता. तत्त्वज्ञान तर त्यांच्या साहित्याचा आत्मा आहे. पण असें असूनहि त्यांच्या साहित्यांत जडता आली नाही. कारण जें अंतःकरण तत्त्वज्ञ होतें तेंच खेळकरहि होतें. त्याचप्रमाणे आपण जें लिहीत आहोंत तें वाचकाकरिता, त्याच्या अंतःकरणावर संस्कार करण्याकरिता याची जाणीव असल्यामुळे, त्यांच्या साहित्यामध्ये 'स्वांतः सुखाय' प्रवृत्ति असली तरी, वाचकावर दृष्टि असल्यामुळे सदभिरुचि कधीहि मलीन झाली नाही. 'धोंडोपंत बर्वे' यांच्या 'स्मृतिलहरी' म्हणजे वामनरावांच्या साहित्यिक व्यक्तिमत्वाचा परिपाक आहे. त्यांत वामनरावांची तत्त्वज्ञान्याची भूमिका आहे, खेळकरपणा आहे, त्यांची सामाजिक दृष्टि आहे, कल्याणकारी समन्वयाची भावना आहे, अनुभवांची परिपक्वता आहे. त्यांचें त्रुटित आणि प्रासंगिक लेखनहि पुष्कळ आहे आणि त्यांत टीकात्मक लेख पुष्कळ आहेत; परंतु त्यांत कठोरता अथवा लावून बोलून खजील अथवा विव्हळ करण्याची प्रवृत्ति नाही. दोषदिग्दर्शन त्यांनी केलें, परंतु त्यांत सुहृदाचें सहृदयत्व कायम राखलें. त्यामुळे ज्यांच्यावर त्यांनी टीका केली तेहि त्यांचे मित्र झाले, शिष्य झाले. जुलैची तारीख २० वामनरावांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस. ता. २० जुलै १९४३ ला वामनरावांचा इहलोकवास संपला.

अत्यंत नम्र अंतःकरणाने वामनरावांच्या पुण्यस्मृतीला आम्ही श्रद्धांजली अर्पण करतों.

*

कै. प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर

वैद्यराज आप्पासाहेब हिर्लेकर यांच्या अकालीं मृत्यूमुळे आयुर्वेद शास्त्रांतील एक निष्णात व धुरंधर पंडित आणि 'शारीर तत्त्वदर्शनम्' या मौलिक ग्रंथाचा लेखक जसा नाहीसा झाला, तसेंच मध्यप्रदेशाच्या मराठी भागांतील संस्कृत व मराठी भाषांवर समान प्रभुत्व असलेला, एक मार्मिक पंडित, सुरस व बहुश्रुत वक्ता आणि रसिक साहित्यिकहि आपणांतून नाहीसा झाला असें म्हणावेसें वाटतें. उमरावती व नागपूर येथे विविध प्रसंगीं त्यांचीं जीं भाषणें झालीं त्यांमध्ये देखील, शुद्ध व सुबोध अशा मराठी भाषेचा अस्खलित ओघ, शब्दांची उत्कृष्ट निवड, शब्दोच्चारांची सुस्पष्टता, प्रतिपादनाची अभिनवता इत्यादि उत्कृष्ट वक्त्याचे गुण पदोपदीं अनुभवास येत. हें सर्व वाङ्मय ग्रंथनिविष्ट न झाल्याने त्याला आपण अंतरलेले आहोंत. ते सहवासाचे मधुर क्षण आता स्मरणानेच पुनः प्रत्ययाला येणार, असें आप्पासाहेबांच्या अनेक स्नेह्यांना वाटल्यावाचून राहाणार नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

कला : परीक्षा आणि पथ्य

मा. ज. कानेटकर

कला हा एक सिद्धांत आहे आणि तिचा आविष्कार होण्याचीं साधनें विपुल असलीं (आम्ही चौसष्ट कला मानल्या आहेत) तरी एका वृत्तिविशेषाला आत्मसात् केल्याशिवाय कोणत्याहि साधनद्वारा कलेचा सिद्धांत प्रस्थापित होऊं शकणार नाही. हा वृत्तिविशेष सर्वच कलांचा दृढभाजक असल्यामुळे कोणत्याहि एका कलाविशेषाच्या सहाय्याने सदर वृत्तिविशेषाचें विश्लेषण केलें तर कलेची खरी परीक्षा व तिच्या मर्यादा स्पष्ट होण्यास मदत होईल.

गायनाची निवड कां केली ?

याकरिता मी गायनाच्या कलेचा उपयोग करणार आहें. याचें कारण असें की ऑ. इं. रेडिओनें नुकतीच जी या क्षेत्रांत आपल्या एका नव्या पायंड्यानें वावटळ उठविली आहे तिच्यामुळें सर्वांच्याच मनांत हा विषय घोळत आहे. यामुळे या विषयाची चर्चा सर्वांनाच विशेष रोचक वाटेल व प्रस्तुत वादांत यथार्थ काय तेंहि कळण्यास आपोआप मदत होईल.

वृत्तिविशेष म्हणजे काय ?

मी सुरुवातीला ज्या वृत्तिविशेषाचा उल्लेख केला आहे तो कोणता, हें प्रथम समजून घेतलें तर पुढील विषय स्पष्ट करण्यास सोपा जाईल. हा वृत्तिविशेष तुम्हांला पाहिजे तर अपघाताच्या सदरांत घाला अगर ईश्वरदत्त देणगीच्या सदरांत घाला. ह्या वृत्तिविशेषाचें व्यावहारिक नांव 'नाद' असें आहे आणि नादाचा धर्मच तुम्हांला बेभान करण्याचा आहे. वेळ, काळ, व्यवहार, नफा, नुकसान इत्यादि कशाचीही पर्वा न करतां जर एखादी गोष्ट तुम्हांला सतत खेचीत असेल तर तो आपला 'नाद' आहे असें म्हणतात. हे नाद धन आणि ऋण दोन्ही असूं शकतात. जे वाईट नाद आहेत त्याचा आपणांस येथे विचार करावयाचा नसून जे चांगले मानले जातात व ज्यांना आपण "कला" म्हणून संबोधतों त्यांचाच येथें विचार करावयाचा आहे. येथे एक श्लेष लक्षांत ठेवणें जरूर आहे. नादच मुळी,—मग तो चांगल्या गोष्टींचा असो की वाईट गोष्टींचा असो—सामान्य व्यवहारी व हिशेबी माणूस वाईट मानतो, त्याचा आपण विचार करण्याचें कारण नाही; कारण नादिष्टपणा ही कलेची प्रथम आवश्यकता आहे. तो एक वृत्तिविशेष आहे. त्याच्या भरवशावरच कोणत्याहि कलेचा आविष्कार संभवतो तेव्हा या श्लेषानें आपण तरी विचकण्याचें कारण नाही. ईश्वरभक्तीसारख्या निर्विवादपणें चांगल्या गोष्टीचा नाद एखाद्याने घेतला तरी तोहि नापसंत असणारे हिरण्यकश्यपु नेहमीच असावयाचे. तेव्हा आपल्या ह्या चर्चेत त्यांचा विचार करतां येत नाही.

यावरून परीक्षा स्पष्ट होईल

या नादाची शेवटची मर्यादा कोणती, याचा आपण विचार करूं म्हणजे कलेची परीक्षा स्पष्ट होईल. ईश्वर भक्तीचेंच उदाहरण घेतलें तर आपणांस असें दिसून येईल की सुरुवातीला हा उपासक अधिक प्रमाणांत व्यवहार करतो व मोजक्या वेळांत ईश्वर-भक्ति करतो. मग हळूहळू त्याचें ईश्वरभक्तीचें प्रमाण वाढतें. शेवटीं तो सदासर्वकाळ ईश्वरभक्तींत निमग्न असतो. त्याची समाधि स्थिति होते. लोक त्याला पागल म्हणतात. तो वाया गेला म्हणून त्याचे आप्तेष्ट खिन्न होतात. पण यांपैकी कशाकडेहि त्याचें लक्ष असत नाही. तो ब्रम्हानंदांत निमग्न असतो. त्याचें देहभानसुद्धा नाहीसें होतें. कला हा जर वृत्तिविशेष असेल तर चौसष्ट कलांपैकी कोणत्याहि कलेची सेवा सुरू केली की अखेरच्या समाधिस्थितीच्या परिणती-पासून सुटकाच होणें शक्य नाही. जर एखादा कलावंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या स्थितीपावेतों न पोचला तर तो भ्रष्ट तपस्वी आहे असें खुशाल मानावें.

यावरून निघणारा अपरिहार्य निष्कर्ष

यावरून हें स्पष्ट होईल की कलेची आणि व्यवहाराची मैत्री तर सोडाच, पण एकत्र वास सुद्धा दुरापास्त आहे. त्यांच्यांतील विपरीतभाव इतका जबर आहे की कलेच्या मार्गावर गेलेल्याला व्यवहाराला तरी रामराम करणें भाग पडेल अगर व्यवहाराला चिकटून राहणाराला कलेला तरी रामराम ठोकावा लागेल. एखादा व्यवहारचतुर माणुस स्वतःस खरा कलावंत समजत असला तर तो आत्मवंचना करीत आहे हें उघड आहे; व्यवहार व कला यांचे संबंध अहिनकुलवत् आहेत असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाही.

कलावंत आणि कलाप्रेमी

कलावंत म्हटला की कलाप्रेमी लोकांचा वर्ग आपोआप आलाच. हा वर्ग म्हणजे निव्वळ प्रतिबिंब स्वरूप आहे हें स्पष्ट आहे. त्यामुळे खुद्द कलावंत आणि त्याची कला यांची जी पातळी असेल त्या पातळीपेक्षा त्याचे उपासक अधिक उंचीवर जाऊं शकणार नाहीत. हिडिंबेचें चित्र आरशासमोर धरलें म्हणजे आरशांतील प्रतिबिंब पद्मिनीचें राहणार नाही हें उघड आहे. त्याचाच अर्थ असा की समाधिस्थितीपावेतों पोचलेल्या कलावंताच्या आविष्काराचें चीज करणारे लोक स्वतः पुरेसे नादिष्ट असावे लागतील. शास्त्रीय गाणें एकसारखें चालू असलें म्हणजे फक्त भावगीतांचा मजा घेण्याची पात्रता असणारे श्रोते एक तर त्या गवयास भावगीतें म्हणण्यास भाग पाडतात अगर नाकें मुरडून पळून जातात हें आपण सर्वांनीच पाहिलें आहे. म्हणजे कलावंत, त्याच्या कलेचा होत असलेला आविष्कार आणि त्यापासून आनंद उपभोगणारे श्रोते हे सर्व एका मुक्कामावर बेभान झाले म्हणजे आपण ती गाण्याची बैठक रंगली असें म्हणतों. "रंगणें" हा समाधि–स्थिति वर्णन करणारा प्राकृत पयार्यशब्द आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

व्यावहारिकतेमुळे सर्वच भ्रष्ट होतात

वरील सर्व सांखळ, कलेची व्यवहाराशीं सांगड घालतांक्षणीं तटकन् तुटते हें आम्ही ओळखूं तर आजच्या वादग्रस्त प्रश्नाचें स्वरूप, त्याचें मूळ व त्यांतील स्पष्ट मुद्दा सर्व स्पष्ट होतील. नादिष्टाचा अर्थ असा की तो माणूस कोणाच्याहि कह्यांत रहात नाही. आणि व्यवहाराची परीक्षा अशी आहे की प्रत्येक गोष्ट पैशाच्या आणि पैसेवाल्यांच्या मातहत असली पाहिजे. या जबरदस्त विसंवादित्वांतून कला व व्यवहार या दोघांचाहि समसमान परिपोष होणार कसा? व्यवहाराकडे लक्ष देणारे कलावंत कलेचें मोल घेऊं लागतांक्षणीं त्यांचें लक्ष कलेपासून परावृत्त होऊन पैशावर खिळून बसतें. असें झाल्याबरोबर पैसे देऊं शकणाराला कलावंतापुढे नम्र होण्याची गरज उरत नाही. या परिस्थितीचा अखेर शेवट असा होतो की कलावंत पूर्णपणें पैशाचा गुलाम बनतो म्हणजे त्याचें संपूर्ण लक्ष वेतनावर केंद्रित होते; म्हणजेच तो पूर्णपणें भानावर येतो व नेहमी भानावर राहतो. याचाच अर्थ असा की तो कलेचा निव्वळ प्राण असा जो वृत्तिविशेष त्यापासून कायमचा भ्रष्ट होतो. याचाच अर्थ असा की कोणत्याहि कलेचा आविष्कार करण्यास तो स्वतःस संपूर्णपणें अपात्र बनवून सोडतो. कलावंतच नासला म्हणजे त्याची कला नासणार हें तर स्पष्टच आहे.

पण कलाप्रेमीहि आपोआप नासतात

पैशाच्या कोष्टकांत कला बसली की मग कलाप्रेमी कोण हेंहि पैशाच्या प्रमाणांत ठरूं लागतें. एखाद्या संस्थेच्या मदतीकरिता एखाद्याचें गाणें ठरलें म्हणजे पहिल्या रांगेंत एखादा अपवाद सोडल्यास गाण्यांत सात मुख्य स्वर असतात एवढेंसुद्धा माहीत नसणारे अतिविद्वान् पहिल्या रांगेंत बसतात हें आपण नेहमी पाहतों. गवई "वाहवा" करिता चौफेर पाहतो, त्याचें गाणें रंगत नाही व कैक प्रसंगीं उत्तम गवयांचा संपूर्ण फज्जा उडून जातो. गाणें आणि पैसा व व्यवहार यांची सांगड घातली की कला, कलावंत व कलाप्रेमी म्हणजे एकंदर सर्वच अधःपतित होण्याखेरीज गत्यंतरच उरत नाही.

यांतून निघणारें सामाजिक संकट

कला आणि पैसा यांचा संबंध निर्माण झाल्याबरोबर समाजावर एक महान् संकट निर्माण होतें. कैक लोक कलेला चरितार्थाचें साधन म्हणून वापरूं इच्छितात आणि अहोरात्र कलेचा नाद असण्याचें सोंग आणतात. यांचा आर्थिक व व्यावहारिक बोजा समाजाला सहन करावा लागतो. तो न भागला म्हणजे खुद्द कलावंतांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बेकारी निर्माण होते. "कलावंतांची वेकारी" या शब्दप्रयोगाइतका विसंगत शब्दप्रयोग सुचविणें अशक्य आहे. जो समाधिस्थितींतला कलावंत आहे तो असें कधीच मानत नाही. त्याला कशाचीच पर्वा नसते. त्याच्या स्वतःच्या अशा गरजा नसतात. समाजाला लाज असेल तर समाजाने त्याला जिवंत ठेवावें नाही तर तो मरण्यास तयार असतो. पण 'व्यवहारचतुर कलावंत' ठराविक पद्धतीने राहूं इच्छितो, त्याचा एक अपरिहार्य खर्च असतो, तो संपूर्णपणें समाजाने भागवावा अशी त्याची अपेक्षा असते. समाजाला तो बोजा वाटतो. म्हणून एकीकडे वेकारी आणि दुसरीकडे समाजावर बोजा बनलेला एक मोठा परोपजीवी वर्ग निर्माण होतो. हें सर्व समाजावर संकट आहे. यामुळे कलेला लोक भिऊं लागतात व कलावंत व शेवटीं त्यांची कला सर्व तिरस्कारास पात्र होते. ज्या फैयाझखानला लोमतोमलाच घंटाभर पुरूं नये त्याला तीन मिनिटांत एका रागाचें रेकार्ड द्यावयास लावणें, पंधरा मिनिटांत एखादी संपूर्ण कथा सांगण्यास एखाद्या हरिदासास भाग पाडणें यापेक्षा गाण्याची अथवा कीर्तनाची जास्त परिणामकारक चेष्टा कारणें अशक्य आहे असें मला वाटतें. अशा चमत्कारांच्या सहाय्याने शास्त्रीय संगीताला उत्तेजन मिळेल असें ऑ. इ. रेडिओला भलेंहि वाटो; पण त्याने शास्त्राचा अधःपातच होईल. कलेचा केवळ आत्मा असा जो समाधिस्थितिप्रत पोचविणारा "नाद" आहे तो तर निकालांत निघेलच —आजच निघाला आहे. रेडिओ लायसेंसची संख्या हें शास्त्रीय संगीताच्या उन्नतीचें गमक मानणें फार चूक होईल; कारण आज रेडिओचा उपयोग वहुतेक घरांतून भांडीं घासणें, कपडे धुणें, चहा बनविणें इत्यादि व्यवहारांत निव्वळ पार्श्वसंगीताप्रमाणे होतो. आदरबुद्धीने, गोंगाट न करतां एखादें कुटुंब एखादा प्रोग्राम ऐकत आहे असें दृश्य मी क्वचित् पाहतों.

सारांश

"नाद", "समाधिस्थिति" ही कलेची परीक्षा आहे आणि पैशापासून कटाक्षाने अलिप्त व असंबंधित असणें हें तिचें कडक पथ्य आहे. असें केलें तरच कला, कलावंत व कलाप्रेमी या सर्वांचें उत्थान होईल. उलट ज्या क्षणीं कलेच्या पायांत पैशाचीं पंजणें पडतील त्या क्षणीं कला, कलावंत व कलाप्रेमी हे सर्व आपल्या खऱ्या भूमिकेपासून भ्रष्ट होतील. हिणकस कलावंतांची गर्दी होईल. समाजावरील परोपजीवी लोकांचा बोजा वाढेल. वेगळी "दर्दी" लोक खऱ्या कलाप्रेमी लोकांची गळचेपी करतील व एकंदरींत सर्व अनवस्था निर्माण होईल.

खरा कलावंत

सरतेशेवटीं रहिमतखांची एकच आठवण देतों म्हणजे कला, कलावंत व कलाप्रेमी यांचे अन्योन्यसंबंध स्पष्ट होतील. रहिमतखां हे विष्णुपंत छत्र्यांच्या सर्कशीबरोबर फार वर्षांपूर्वी नागपूरला आले तेव्हा कै. गोपाळरावजी भिडयांच्या आग्रहामुळे त्यांचें गाणें करविण्याचा घाट घातला, मोठ्या प्रयासाने विष्णुपंत छत्र्यांनी त्यांचें गाणें सुरू करविलें व थोडा वेळ तें चाललें. बर्डीवरील सर्व प्रतिष्ठित व वकील मंडळी हजर होती. तिकडे गाणें चालू व इकडे या लोकांच्या कोर्टखटल्याच्या अगर कचेरींतील गप्पा सुरू. खांसाहेबांना गाण्यांत अडथळा होऊं लागला. गोंगाट थांबेना. शेवटीं खांसाहेबांनी अकस्मात तंबोऱ्याच्या तारांवर पंजा ठेवला, गाणें वंद केलें व तंबोरा खाली ठेवला. छत्र्यांनी विचारलें, "कहिये खांसाहब! क्या बात है?" खांसाहेब उतरले "इन गधों के सामने क्या गावें?" याला म्हणतात कलावंत. कला अशा कलावंतांनाच प्रसन्न होते. कलेला पैशाचें कुंपण घालण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत आणि पैशाच्या कुंपणांत जाऊन बसण्याकरिता धडपडणारे हे कलावंत नव्हे. लग्नांत जसे वाजंत्री लागतात तसा फॅशन म्हणून ज्यांना कसला तरी गोंगाट सतत चालू हवा असतो ते कलाप्रेमीहि नव्हेत.

आज जें चालू आहे ती कलेची नितांत चेष्टा आहे. कलेची चेष्टा करून कलेची उन्नति होईल असा आम्ही भ्रम करून घेतला असेल तर त्यांत खुद्द कलेचें कांही नुकसान नाही. आम्हीच स्वतःस कलेच्या खऱ्या आनंदाला पारखे करून सोडत आहोंत. स्वतःचे पैसे खर्च करून कलेपासून लांब पळण्याचें जर आम्ही ठरविलें असेल तर या आमच्या दीडशहाणपणाला कोणीहि आडकाठी घालील अशी आम्ही भीति वाळगण्याचें अर्थात् यत्किंचित्हि कारण नाही. इत्यलम्.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

शाप

श्री. के. बोबडे

पश्चिमेकडच्या वाऱ्यानं दाराचा पडदा वर उचलला आणि त्याचवेळीं अनायासें दारांत आलेल्या सुंदरावाईंना जें दृश्य दिसलं त्यामुळे त्यांच्या हृदयांत अनामिक कळ निर्माण झाली. त्यांना कांहीतरी तीक्ष्णपणें टोंचलं. कंचुकीनं आवळलेल्या आपल्या स्तनद्वयांकडे त्यांनी पाहिलं आणि एक उसासा टाकला...

त्यांच्या घरांत काम करणारी आणि त्यांच्याच आवारांतल्या एका खोलींत राहणारी त्यांची मोलकरीण आपल्या वर्षाच्या पिलाला पदराखाली घेऊन स्तनपान करवीत होती. मांडीवर पडलेलं तें मूल स्तन चोखतां चोखतां आईकडे पहात होतं आणि त्याला पितांना पाहून आई त्याच्याकडे ज्या दृष्टीनं पहात होती तींत सारं परब्रम्ह भरलं होतं...

अगदी एकच क्षण. पण त्या दृश्याकडे सुंदरावाईंना पाहवलं नाही. त्या वळल्या आणि नरम नरम कोचावर त्याहून आपलं नरम अंग त्यांनी टाकलं. तो स्प्रिंगचा कोच त्यांच्या त्या नरम भारानंही किंचित् वाकला आणि मग पुन्हा वर आला. त्या प्रशस्त खोलींतली सजावट, प्रत्येक वस्तु सुंदरावाईंच्या सुखासीन आयुष्याची साक्ष देत होती. सुंदरावाईंनी ठेवलेली प्रत्येक वस्तु अगदी जिथल्या तिथ होती. किंचित्हि हललेली किंवा बदललेली नव्हती. संसाराच्या सुरुवातीला कांही वर्षं सुंदरावाईंना ही टापटीप, हा सुव्यवस्थितपणा अगदी हवा होता. नवऱ्यानंहि त्यांनी लावलेली वस्तु किंचित् हलवली तर त्यांना ती खपत नसे. आणि तेवढयाहि कारणाकरता 'अव्यवस्थित-पणा'चा शिक्का त्यांच्यावर मारीत. त्यावर वामनराव नुसते हसत आणि कधीकधी म्हणत 'बरं, बरं. पाहूं या किती दिवस टिकतो तुझा हा टापटिपीचा कटाक्ष ! '

पण मग कांही वर्षांनी सुंदरावाईंना त्यांची ही टापटीप, सौंदर्यदृष्टि बोचायला लागली. त्यांना मनांतून खरंच वाटायला लागलं, जागच्या जागीं ठेवलेल्या या वस्तु कुणीतरी हलवायला पाहिजेत... फोडायला पाहिजेत... कांचेची ती सुंदर फुलदाणी अगदी लग्नापासून त्याच टेबलावर त्या पहात होत्या. त्यांना वाटे ही कुणीतरी फोडायला पाहिजे आणि मग आपण लटक्या रागानं पण हसऱ्या ओठानं म्हणायला पाहिजे ' हें काय केलंस लवाडा, फोडलीस... छान...' वामनरावांच्या टेबलावरले त्यांनी व्यवस्थित ठेवलेले कागद अगदी जसेच्या तसे रहात. वामनरावांनी किंचित् काम करून ते विस्कळीत ठेवले तर त्या त्यांना दोष देत. आणि म्हणत् 'खरंच तुमचं टेबल तुम्हाला व्यवस्थित ठेवतां येत नाही...' आता मात्र त्यांना वाटायला लागलं होतं, ही व्यवस्था कुणीतरी बिघडवायला पाहिजे आणि वामनरावांनी म्हणायला पाहिजे 'हा पाहिलास तुझ्या मुलीचा प्रताप. आता कसं खपतं ग तुला हें...'

तसले ते काल्पनिक शब्द सुंदरावाईंच्या कानांत घुमत. त्यांना वावर करीत. बेचैन करीत. आता तें दृश्य पाहून त्यांचं मन अस्वस्थ झालं... उदास झालं. त्या नरम कोचावर बसल्या बसल्या त्यांनी उगीचच खोलीभर नजर टाकली. कांही वेळापूर्वी त्यांच्या दोन मैत्रिणी त्यांच्याकडे बसायास आल्या होत्या. घरांतला तो व्यवस्थितपणा, सजावट पाहून एकीनं म्हटलं होतं 'कशी साधते हो, सुंदरावाई, तुम्हाला ही टापटीप ? ' आणि सुंदरावाईंचं उत्तर येण्यापूर्वीच दुसरीनं म्हटलं होतं, 'न साधायला काय झालं? घरांत मूलबाळ नसलं की व्यवस्थितपणा कोण बिघडवणार? ' त्या तिच्या उत्तरानं सुंदरावाईंना शरमल्यासारखं झालं होतं. त्यांच्या हृदयांतल्या नाजुक कोपऱ्याला त्यांच्या मैत्रिणीनं डिवचलं होतं. मैत्रिणी गेल्या. वादळ निघून जावं पण त्यानं केलेले परिणाम मात्र कायम रहावे तसंच सुंदरावाईचं झालं.

त्यांच्या समोरच्या टेबलावर ठेवलेल्या छोटयाशा पितळी कुंडींत पाण्यांत वाढणाऱ्या वेलींचीं कोवळीं पानं डोलत होतीं. सुंदरावाई कोचावरून उठल्या. ती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुंडी हातीं घेऊन तीं पानं त्यांनी आपल्या गालांना लावलीं. लहान बालकाचीं कोमल बोटंच आपल्या गालांना स्पर्श करीत आहेत असं त्यांना वाटलं. एका गोड हुरहुरीनं त्यांचं अंग शाहारलं.

त्यांनी घड्याळाकडे पाहिलं. सहा वाजून तीस मिनिटं झालीं होतीं. वामनराव अजून परतले नव्हते. आतांशी ते नेहमीच उशिरा घरीं येत. जणू त्यांना बायकोची आठवण रहात नसे. सुटीच्या दिवशींहि बराच वेळ ते बाहेर राहात. एकदा त्यावद्दल सुंदराबाईंनी त्यांना विचारलं होतं आणि त्यावर त्यांनी उत्तर दिलं होतं, 'एक काळ असा असतो की माणसाला बायकोच्या आकर्षणामुळं घराची ओढ असते, आणि त्यानंतर एक काळ असा येतो की माणसाला मुलांच्या ओढीनं घरीं यावंस वाटतं. सुंदर, हा माझा दुसरा काळ आहे! आणि असं म्हणून ते उगीचच हसले होते. त्यांचं तें हसणं सुंदराबाईंना परडींतल्या सुकलेल्या फुलांप्रमाणं वाटलं होतं. त्यांच्या शब्दांतला भाव सुंदराबाई समजल्या होत्या. त्यांचं मन दुखलं होतं. त्यानंतर त्यांनी त्यावद्दल वामनरावांना विचारलं नव्हतं, पण त्यांना मात्र मनांतून वाटायला लागलं होतं. ही शिक्षा आपणाला काय म्हणून ?...

घड्याळाचा काटा तिसांच्या घरांतून चाळिसाच्या घराकडे वळला होता. तसंच सुंदराबाईंचं वयहि समोरच्या ओसरीवर होतं तोंपर्यंत किती अधीरतेनं वामनराव घरीं यायचे. आणि किती काळ घरीं राहयचे! इतकं की कधीकधी सुंदराबाईंना त्यांना संकोचून म्हणावं लागे माझ्याभोंवती किती रुंजी घालतां हो? इतकं बावरं होऊं नये माणसानं...' काळाच्या कांही पायऱ्या उतरून त्यांचं वय मागच्या घरांत आलं आणि तेंहि त्यांना एकट्यांना घेऊन...आणि मग वामनरावांची ती ओढ कमी झाली...सुंदराबाईंना मग एकटेपणाचं दुःख व्हायला लागलं...पांच वाजतां कचेरींतून बाहेर पडलेले वामनराव कुणातरी मित्राकडें गप्पा मारीत बसले असतील किंवा क्लबांत जाऊन पत्ते खेळत असतील. घरांत एकट्या असलेल्या बायकोची त्यांना आठवणही नसेल. फिकीरही नसेल... दिवसभर रात्रभरही घरीं न आलं तरी त्यांना चालण्यासारखं, शोभण्यासारखं होतं...मनाची निराशा विसरायला त्यांना अनेक जागा होत्या. पण सुंदराबाईंना वाटे, आपण आपलं गुप्त दुःख कुठं जाऊन विसरायचं? त्यांच्या एखाद्या मैत्रिणीकडे सुंदराबाई गेल्या की, मैत्रिणी आपल्या मुलाबाळांत दंग रहात आणि तें भरल्या घराचं दृश्य पाहून सुंदराबाईंना अधिकच बेचैन होई. सुंदराबाई घरीं येत आणि मग एकटं घर त्यांना खायला उठे...

आताहि त्यांच्या भुकेल्या हृदयाच्या एकटेंपणाच्या असह्य टोचणींत त्यांची तगमग झाली. त्या उठल्या. खिडकीशीं आल्या. दिशा अंधारत होत्या. सुंदराबाईंच्या मनाप्रमाणं. सायंकाळच्या सावल्या ओसरत होत्या. सुंदराबाईंच्या आशाप्रमाणं. रानांतून दिवसभर चरून आलेल्या गाई घरीं चालल्या होत्या. त्यांतल्या कांही हंबरत लगबग चालल्या होत्या. गोठ्यांत बांधलेल्या पिलांना चाटायला, स्तनांशी लावायला...कंचुकीनं आवळलेल्या आपल्या स्तनद्वयांकडे सुंदराबाईंनी पाहिलं आणि उसासा टाकला!...

नीतिमत्तेचा अर्थ

सुप्रसिद्ध इंग्रज नट मॅकरेडी फार दांभिक होता. ज्या रंगभूमीनं त्याला प्रतिष्ठा आणि पैसा मिळवून दिला तिचा वारा देखील आपल्या मुलांना लागूं नये याविषयी तो फार दक्ष असे. स्वतःच्या नीतिमत्तेची शेखी मिरवण्याची त्याला भारी हौस. धर्मगुरूंना त्याची ही वृत्ति फार आवडायची व ते त्याची स्तुति करीत. परस्परप्रशंसेच्या या फंदांत पडून एकदा एक धर्मगुरु मॅकरेडीशीं बायरन कवीचा परिचय करून देतांना म्हणाला, "हे सुप्रसिद्ध नट मॅकरेडी. फार नीतिवान आहेत हे!

बायरननं संथपणें उत्तर दिलं, "अस्सं, म्हणजे यांना सामान्य माणसापेक्षा आठवड्याला पांच पौंड वेतन अधिक हवं, हेंच ना?"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कां ही क वि ता

दुपार

पिते नीलिमा दुपार पिवळी
आपुल्याशींच हासते कळी

सावळ्या छायेंत निजला पांथ
पाऊलवाटही स्तब्ध, विश्रांत

पांढरा एकला फिरतो ढग
पाहत खालचें विश्रब्ध जग

हातांत हात गुंफून सावल्या
बसल्या बुंध्याशीं दावीत वांकुल्या

पक्षाचें जोडपें पानांच्या आड
फेकतें खडा पोरगें द्वाड

अशा ह्या दुपारीं एखादी सून
चालली नदीला घेऊन धुणं !

✳

सांज

फिकट तांवूस सांज
दूर देवळांत वाजे आरतीची झांज
किनाऱ्याशीं बोले लाट
टाकून संकोच, लाज !

पाय मोकळे सोडून पाण्यांत
हात गुंफून गळ्यांत
झालें मोकळें हृद्गत
गंध भरला वाऱ्यांत !

संथ वाहणारें जळ
उकलले सारे पीळ
दिसे मनाचाहि आता तळ

नदीकिनारीं निवांत
असेंच बसले राहूं
सांजेचे बदलते रंग पाहूं !

✳

रिता—

उगा हालवितो चांफा
नसतांना फुलें पानें
कसें जमावें आपणां
रित्या मनांनी भेटणें

गुणगुणतो स्वतःशीं
शब्द नसलेलें गीत
आंगवळणीं पडली
रुळलेली जनरीत !

पिऊं पाहतो नीलिमा
स्वप्न पकडूं पाहतो
भारावून जातो तर—
असा रिता कां राहतो ?

—मनोहर म. देशपांडे

रेशमी जळांत—

रेशमी जळांत : जर्तारी रेखा;
मोगरी ढगाची गंधित छाया ;
टपोऱ्या लाटांचा कामोद मंद्र;
अमित मधुर रंगांच्या राया ;

रेशमी जळांत : जास्वंद स्मृति;
हळूच उमले काळाचा कोप :

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रेशमी जळांत रेशमी पाय
सोडून बसली तरुणी कोण ?

हळूच येऊनी झांकलीं कोणीं
आतुर सजल लोचनें तिचीं !
पाटली–पल्लव पदर खुला
झांकतो कार्यीच्या जर्तारी वीचि !

हलके हातांत घालून हात
मोजत पाऊलें फिरती कोण ?
हिरवा सघन करंजी वृक्ष
जपतो कुणाच्या नांवाची खूण ?

रेशमी जळांत झुलती स्पष्ट
कुणाच्या दोघांच्या अधीर छाया ?
भुलून जगाचें अस्तित्व आणि
एकत्र येऊनी एकच झाल्या ?

रेशमी जळांत : जर्तारी रेखा;
मोगरी ढगांची गंधित छाया;
टपोऱ्या लाटांचा कामोद मंद्र;
अमित मधुर रंगांच्या राया;

रेशमी जळांत कांहीच असें
उरलें नाही रे खिरला दिन;
नाजूक लाजरी सरली सांज;
सरलें सालस हळदी ऊन;

करंजी वृक्षाच्या लोचनीं आंसूं;
खद्योत करीत काजळी गर्द;
दूरच्या रंगिल जपत स्मृति;
रेशमी जळांत जोगिया आर्त....

रेशमी जळांत जोगिया आर्त....

—दत्तात्रेय कुळकर्णी

आम्ही राबणारे हात !

राबणारे हात ! आम्ही राबणारे हात !
पारखा हीं मन्‌गटें वा पारखा पोलाद,
ताठस्नायू, राठ बोटें, बेइमानी बाद,
ध्येयवादी वाहतो रक्तांतुनी उन्माद,
साधुनी संधी करूं अंतीमचा आघात !
आम्ही राबणारे हात ! १

राबतों आम्ही शिवारीं कोयते घेऊन,
हालतों भात्यासवें अग्नीस प्रक्षोभून,
कारखान्यांतून, शाळांतून घामेजून,
आमुचीं स्वप्नें विरालीं त्याच हो घामांत !
आम्ही राबणारे हात ! २

आमुच्यासाठीच सारे कायदेकानून,
हातबेडया हासती आलिंगना देऊन,
खाउनी आसूड जातो खत्ताळून,
अन् तरीही शोधतों पूर्वेस अंधारांत !
आम्ही राबणारे हात ! ३

चंगीझा तूं दे ! "अहिंसेचे धडे" तूं दे !
रक्तबिंदूंतून "शांतीपाठ" आम्हां दे !
रोखुनी संगीन दावी "सत्य" एखादें !
ना तमा आम्हां, घुमें संगीत अस्मानांत,....
...."आम्ही राबणारे हात !" ४

—सुरेश श्रीधर भट

जागृती–

जागृती, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं !
कोप जाणे गे किती आराधनने
मानवाला यामिनीचा प्रेमलाभ,
विग्रहाच्या तीक्ष्ण घावांनी क्षणिक
चांदण्याचा उमललेला स्वप्नताज,
काल कां रुसलीस तूं संध्येपरी ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चुंबनें नाजुक उषेचीं ये खुलव तूं!
जागृती, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं!

गे तुझ्या बाहूंत ईर्षा हासते
जिंदगी हिंदोल—छायांचे पहाते;
हिमकणां जैशी फलाशा लोपते
मानवाला दानवी दावीत नृत्यें
हास्य ओठीं क्रूर ये घेऊन भोळे—
कोड विश्वाचें नको पुरवूं परंतु
जागृती, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं!

वाटलें होतें कितीदा: तूं गडे
मजला नवें संगीत द्यावें, प्राण द्यावे
हासणाऱ्या पापण्यांच्या पाकळ्यांनी
गे स्मृतींचें तें सुंगधी गान गावें
कोष तेजाचे रिकामे हे अता
तेच सोनेरी क्षणांचे स्वर झुलव तूं
जागृती निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं!

—राम शेवाळकर

—प्रीतिदेवते

तूंच खरोखर, मम विश्वांतिल
ब्रह्म निरंतर, तत्त्व चिरंतन
आत्मा एकच ध्यातो, गातो—
ब्रह्मावांचुनि, तत्त्वावांचुनि
विश्वहि मृण्मय, मानव तममय

प्रीतिदेवते, तूंच एकली
प्रशांत ज्योती, जरी सानुली—
इवल्याशा त्या ज्योतीमधुनी
ब्रह्म उगवलें, विश्व उमललें

ज्योत निमाली, एकचि तांडव
ब्रह्म संपलें, विझला मानव
विश्वहि कुठलें, कुठलें अभिनव!
एकचि उरलें—तांडव! तांडव!!

मानवता ती कुठली ही मग?—

कशास मग त्या नव्या मोटरी,
उंच हवेल्या ताजमहाल
कशास मग तें कला नि जीवन
सौंदर्याचें कशास गान?
मानव मृण्मय झाल्यानंतर?—

गंगा यमुना कशास सिंधू
हिमालयाची उन्नत मान?
कैलासचि मग हवा कशाला
कैलासांतचि सर्वहि प्राण—!

सूर्यचंद्र मग दीप कशाला?
तारक—पुष्पांचें आवर्तन
वाऱ्याची मग शीळ कशाला?
कशास निर्झरिणींचें नर्तन—?

आणि म्हणूनिच टाहो घुमतो—
दिक्कालाच्या प्रलयामधुनी—
'प्रीतिदेवते, तूंच खरोखर—
विश्वांतिल ह्या तत्त्व चिरंतन!—'

शरीरांतल्या अणुरेणूंतुन
जिनगानीच्या कणाकणांतुन
ओठामधल्या नैवेद्यांतुन
नेत्रांतिल मम फुलवातींतुन

हृदयाच्या या सांदिसांदितुन—
एकच घुमतो कसलासा सुर—
'प्रीतिदेवते, तूंच खरोखर
विश्वांतिल मम तत्त्व चिरंतन—'

—सुरेश डोळके

नाही अजुनि मर्म गवसलें

शैशवांत मी होतों जेव्हा
शब्दांनी मज भुरळ घातली
आणिक नेले फसवुनि मोहक
व्यासांच्या सृष्टींत अचानक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

……..भुललों,
फसलों, वेडा झालों,
आणि निघालों
विविध रसांनी नटलेल्या त्या
शब्दसृष्टिचा शोध घ्यावया !

तिथे पाहिलें,
कातिव कोरिव, मुग्ध मनोहर
भव्य भयानक, हसरे दुखरे
शुभ्र शांत अन इंद्रधनुष्यीं
अनंत पुतळे बोलत होते
'मृत्युंजय मी !
'चिरंजीव मी'
त्या शिल्पांच्या
मधुवचनांनी मुग्ध जाहलों.
आणि देखिले,

अगणित मानव
मनांत घेउनी, नाजुक लवचिक
गहिऱ्या हिरव्या रेशिम–आशा
धुंद होउनी होते घडवित
अपुले पुतळे !
जिवंत पुतळे !!

शब्दसृष्टिचा पह्याटवारा
पिउनी फिरलें अजाण मानस
इतुकें फिरलें
इतुकें फिरलें,
कळलें नाही चोर पाउलीं
कधीच माझें शैशव गेलें
गेलें शैशव
देउनि मीपण
क्षुद्रपणाचें प्रसरित सांवट।

नकळत लाजत मीहि शिरलों
घडवित मानव जेथे पुतळे
थवकत विचकत छिनूं लागलों
माझे पुतळे !
जिवंत पुतळे !!

भिनली होती नसांनसांतुनि
काळी ठिक्कर जहरी ईर्षा
चाटित होत्या कौतुक नवथर
आसुसलेल्या जिभा कोवळ्या

अर्थ कळेना शिल्पाचा त्या
अबोध जाणीव शब्दीं शिरेना
होतों घडवित कृत्रिम कांही
करीत होते चेटुक मीपण.

धुंद अपुरी
हळूच वळतां दृष्टी चंचळ
दिसलें अद्‌भुत !
घडतां घडतां किती ठिकाणीं
अपूर्ण मूर्ति होत्या भंगत !

साचत होत्या किती ठिकाणीं
शब्दांच्या त्या कुरूप राशी
किती ठिकाणीं आणि ठाकल्या
मूर्ती म्हणुनी मुक्या बाहुल्या

दिसलें अद्‌भुत….
धुक्यांत धूसर.
कराल चकवी सृष्टीची त्या
उलट्या पायीं नाचत होती.
भक्षित होती कराकरा अन
दोन तीक्ष्ण दातांत चिरडुनी
लहान मोठे पुतळे अगणित !
पुतळे अगणित !!

आणिक किमया
चकवीची त्या
घेउनि हातीं विझत्या पणत्या
क्षणभर तेजस् क्षुद्र कीर्तिच्या
भुलवित होती, भारित होती
मंत्रमुग्ध सापासम मानव
वेडे मानव !

रचीत होतों त्यांच्यासह मी
(अमरत्वाची आंस भाबडी)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कसला पुतळा कसली मूर्ती
केवळ थडगीं!
केवळ थडगीं!!

हाय पाहिलें,
नाचत नाचत छाया काळी
क्रूर अधाशी नजर लावुनी
अपुऱ्या अर्ध्या शिल्पांवर मम
क्षणाक्षणाला पसरत होती

स्वप्न भंगलें.
घडण थांबली.
हसली किमया
विरलें मृगजळ.
व्याकुळ पाडस करितें तडफड
म्लान मुखावर असह्य तगमग
घाव विषारी मांस कोवळें
वेदनेंत त्या व्रह्म वितळलें.

उगीच कां मग
मनांत शिरली
आशा नाजुक
आंस आगळी ?
उगिच कशाला मोहक फसव्या
मधुशब्दांनी भुरळ पाडली ?

कशास धडपड ?
कशास छिन छिन ?
भविष्यांत जर काळी चाहुल
व्यर्थ घडण का ?
प्रश्न निरुत्तर !

कुणी बोललें
खोल अंतरीं
धुंद अपूरी
हवी कशाला ?
हवी कशाला निष्ठुर जाणिव
हवें कशाला शब्दशिल्प जें
मूक अचेतन निर्जिव विद्रुप !

हवी कशाला ?
हवी कशाला
निर्मितिच्या श्वासांत भयानक
मृत्यूची ती अभद्र घरघर ?

तसा परतलों
टाकुनि पुतळा, (शब्दसापळा !)
अर्घ्यांवरती.
तरिहि माझी
कातर भिरभिर आतुर दृष्टी
गेली थवकत पुन्हा पुन्हा अन
मर्मामधुनी रूप घेउनि
अमरत्वाची शाश्वत गाणीं
गुणगुणणाऱ्या हसऱ्या दुसऱ्या
शिल्पांवरती खिळून बसली.

आज उभा मी गर्दी करुनी
गोल रुप्याच्या परिघावरती
यंत्र होउनी फिरतां अविरत

येते भोवळ !
कधी वाटतें,
जावें फिरुनी धुंद होउनी
शब्दसृष्टिच्या कुशीं शिरावें
टाकुनि ईर्षा, विसरुनि मीपण
छिनित वसावें,
छिन छिन छिन छिन
सौंदर्याची सजीव शिल्पें !

ओढ अनावर जाळित अंतर
झेप घेउनी मन पर्युत्सुक
निघतां वेगें
आहे थवकत
जाणिवेंतल्या रेषेवरती,
"अजुनी नाही मर्म गवसलें
नाही अजुनी मर्म गवसलें."

—बाळ गंगाधर देव

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकऱ्यांचीं 'प्रेमगीतें'

प्रा. पां. कृ. सावळापूरकर, नागपूर

गडकऱ्यांच्या वाग्वैजयंती या संग्रहांत 'प्रेमगीतें' या सदरांत सामान्यतः पडणारीं सुमारें चाळीस गीतें आहेत. 'शेवटचें प्रेमगीत' या नांवाची एक कविता या संग्रहांत शेवटीं संग्रहीत केलेली असल्यामुळे तसल्या प्रकारच्या गीतांना प्रेमगीत म्हणावें असा कवीचाच मनोदय दिसतो. इतर अनेक आधुनिक तरुण कवी-प्रमाणे गडकऱ्यांचाहि 'प्रेम' हा आवडीचा विषय दिसतो व तें प्रेम एका विशिष्ट प्रेयसीभोंवती घुंटमळत असलेलें दिसतें. 'त्या चित्रांतील देवीचा मी विकला शाहीर' असें उद्गार 'अरुण' कवितेंत गडकऱ्यांनी काढले असल्यामुळे व तें चित्र त्यांच्या (म्हणजे या प्रेमविषयक कवितांच्या नायकाच्या;–कारण यांतील सर्व कविता कवीचें आत्मचरित्र आहे असें समजून त्या संबंधीं कोणतेंहि अनुमान काढणें धोक्याचें आहे. कोणत्याहि कवीच्या खाजगी आयुष्याची सार्वजनिक चर्चा करण्याचा आपणास अधिकारहि नाही असें मला वाटतें) प्रेयसीचेंच असल्यामुळे गडकऱ्यांना 'प्रेमाचे शाहीर' अशी पदवी टीकाकारांनी दिली आहे.

प्रेमगीतांचें सामान्य स्वरूप कसें असावें, गडकऱ्यांच्या प्रेमगीतांची त्या दृष्टीने जात कोणती, त्यांतील रस वा भाव काय मानावयाचे असे विशिष्ट प्रश्न मनासमोर उभे राहतात. प्रेम आणि प्रणय यांत मी अंतर मानतों. प्रेम ही सामान्य आणि बहुतांशीं सात्त्विक अशी भावना असून प्रणय ही विशिष्ट आणि राजस स्वरूपाची भावना आहे. प्रणयामध्ये अंतःकरणाच्या आकर्षणाप्रमाणेच प्रियकर प्रेयसीच्या परस्पर शरीराकर्षणाचाहि फार मोठा भाग असतो. म्हणून या गीतांना म्हणावयाचेंच झालें तर प्रणयगीतें म्हणतां येईल. या नांवालाहि माझा थोडा आक्षेप आहेच पण प्रेमगीतापेक्षा हा शब्द त्यांतल्या त्यांत जास्त समर्पक आहे एवढेंच मला म्हणावयाचें आहे.

रसांची संख्या किती मानावी या बाबतींत मतभेद असला तरी शृंगार रस मानण्याच्या बाबतींत कोणाचाहि मतभेद नाही. किंबहुना त्याला रसराज म्हणून मूर्धाभिषेकच झाला आहे. स्त्रीपुरुषविषयक परस्पर रति हा या रसाचा स्थायिभाव असून तो आलंबनउद्दीपनांनी रसिकांच्या हृदयांत उत्पन्न व परिपुष्ट झाला म्हणजे रस या पदवीला प्राप्त होतो इत्यादि रसशास्त्रांतील प्रमेयें सर्वमान्य व सर्वज्ञात आहेत. 'रतिर्देवादिविषया व्यभिचारी तथाजितः भावः प्रोक्तः' या 'भाव' शब्दाच्या व्याख्येबाबत आज मतभेद होऊं शकेल; पण रस किंवा भाव यांचें 'अनौचित्यप्रवर्तन' झालें तर तेथे रसाभास किंवा भावाभास मानावा याबद्दल दुमत होण्याचें कारण नाही.

रति हा विकार एकतर्फी की दुतर्फी? मला वाटतें कांही एका प्रमाणांत एकतर्फी पण पुढें मात्र तो दुतर्फी. तसें होणार नाही तर त्या विकाराचें साफल्यच होणार नाही. म्हणूनच शृंगाररसाचे संभोग व विप्रलंभ असे प्रकार कल्पून संभोग अविभाज्य मानला असून विप्रलंभाचे अनेक प्रकार कल्पावे लागले. सामान्यतः मीलनांत तृप्ति म्हणून शब्दांचा अभाव असतो. याच कारणाने संभोग शृंगाराचीं उदाहरणें फारशीं सापडत नाहीत. विप्रलंभ मात्र कवींना आज युगानुयुगें मुखरित करीत आला आहे. या विप्रलंभाचें पूर्व साहित्यशास्त्रज्ञांनी अभिलाषा, विरह, ईर्षा, प्रवास आणि शापहेतु असे पांच प्रकार मानले आहेत. प्रियकर-प्रेयसीच्या मीलनांत अंतरायभूत अशा अनेक नव्या गोष्टी कालांतराने शिरल्या असतील. त्यांची रसदृष्ट्या चर्चा मी येथे अवकाशाभावीं करीत नाही. तथापि वरील पंचकडीपैकी प्रवास व शापहेतु हीं कारणें आज प्रवासाच्या सुकरतेमुळे व शापसामर्थ्याच्या नाशामुळे विप्रलंभाला राहिलींच नाहीत. ईर्षाहि बऱ्याच प्रमाणांत नष्ट झाली आहे. अभिलाषा आणि विरह हे मात्र कायम आहेत. वस्तुतः विरह हा विप्रलंभाचा स्वतंत्र प्रकार मानण्यापेक्षा अभिलाषोत्तर सर्व विप्रलंभ प्रकारांना सर्वसामान्यपणे ती संज्ञा देणें योग्य ठरेल. आता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहतां राहिली अभिलाषा. हिलाहि कांही मर्यादा आहेत. 'विद्यावय द्रविणरूप इहीं करोनी' जे सम-समान असतील अशांनी परस्परांची अभिलाषा करणें योग्य आहे. या अभिलाषेला प्रत्यक्षांत समाजाची आणि वाङ्मयांत वाचकांची सहानुभूति मिळूं शकते. अशा अनुरूप व अनुगुण प्रियकर–प्रेयसींनी प्रथम दुसऱ्याला नकळत आपल्या ठिकाणीं आपल्या संकल्पित जोडीदाराची अभिलाषा करीत राहावें यांत कांही आश्चर्य नाही. अशा प्रकारच्या गीतांत शृंगाराचा उद्भव होऊं शकेल. परंतु हें अभिलाषा करणारें जोडपें परस्पर विसदृश असेल तर त्यांचें तें करणें हास्यास्पद ठरेल. एखाद्या अशिक्षित भिकाऱ्याने एखाद्या सुशिक्षित राजकन्येची किंवा एखाद्या घटिंगणाने एखाद्या मृदुलेची आशा धरली तर त्याचा तसें करण्याचा हक्क, त्याच्या अंतःकरणाचा निश्चय, प्रामाणिकपणा आणि आर्तता मान्य करूनहि, त्याचें औचित्य आपणास पटणार नाही. अशा प्रेमिकाबद्दल फार तर कीव निर्माण होईल. पण त्याच्या प्रेमापेक्षा त्याच्या मूर्खपणाचाच ठसा अधिक उमटेल ! (नागपुरांत महाल विभागांत कित्येक वर्षांपूर्वी विरवल नांवाचा एक वेडा भिकारी 'मैं पंचम जॉर्ज के लडकी से शादी करूंगा' असें मोठ्या आर्ततेने ओरडत फिरत असे ! किंवहुना त्याचें वेड या विचित्र अभिलाषेंतूनच निर्माण झालें होतें, त्याची या समयीं आठवण होते ! १९३६ च्या जानेवारींत राजे पंचम जॉर्ज यांचा अंत झाल्यावर पंधरवाडयाच्या आंतच या राजकन्याभिलाषीचाहि अंत झाला हाहि योगायोगच म्हणावयाचा !)

अभिलाषेंतील अनौचित्य प्रवर्तन अनेक प्रकारचें असूं शकेल. प्रत्येक काळांत प्रचलित असलेल्या धर्म आणि नीति यांच्या कल्पनेमुळेहि अभिलाषेच्या औचित्याला मर्यादा पडूं शकतील. रावणाने सीतेचा अनुनय अगदी रामाच्याच शब्दांत केला म्हणून तेथें शृंगार उत्पन्न होईल काय ? एखादी अभिलाषा प्रारंभीं उचित असली तरी ती संकल्पित जोडीदाराला कळल्यावर त्याने किंवा तिने आपल्या प्रतिपक्षाला कायमचें झिडकारलें, अवहेलना केली, उपहास केला, फसविलें तर ती अभिलाषा पूर्वीच्या स्वरूपांत राहूं शकणार नाही. अशा रीतीने अभिलाषेंतच वैफल्य आल्यानंतर होणारा शोक हा विरहाचा दर्शक मानतां येणार नाही. कारण विरहांतहि मीलनाची कल्पना अभिप्रेत असतेच व जेथे मीलनाची काल्पनिकहि शक्यता नसते तेथे शृंगाराचा उद्भव होणें देखील कठीण.

गडकऱ्यांच्या तथाकथित 'प्रेमगीतां'ची वरील विचारसरणीने छाननी केली तर आपणास त्यांच्या प्रेमवैफल्याचा अनुभव वारंवार येतो. त्यांच्या प्रेमगीतांत आत्मचरित्रात्मक, पात्रमुखी आणि अप्रत्यक्ष असे तीन मुख्य विभाग आढळून येतात. त्यांतून प्रेयसीनें झिडकारलें असतांहि प्रियकराची अभिलाषा आणि आशा कायमच आहे असें आपणास दिसून येतें. ही झिडकारणी झाल्यास त्यांतून अनुनय, निराशा, दुःख आणि वैताग (वैराग्य नव्हे !) अशा प्रवृत्ति निर्माण होणें क्रमप्राप्तच आहे. या सर्व प्रवृत्ति गडकऱ्यांच्या भिन्नभिन्न प्रेमगीतांत दिसतात. तीं प्रेमगीतें वाचकांना सहज निवडतां येण्यासारखीं आहेत. या सर्व विफल प्रेमगीतांना विसदृश व तृप्तिदर्शक अशा फक्त तीनच कविता यांत दिसतात. 'पुनर्जात प्रेमास,' 'प्रेमपाठ' आणि 'प्रेमकाळ' या त्या तीन कविता होत. पण त्यांतील तृप्ति गंभीर व स्थायी नसून उथळ व तात्कालिक आहे. 'अल्लड प्रेमास' आणि 'हृदयास' या कवितांत जो 'मनास उपदेश' केला आहे त्यांत वैताग स्पष्ट दिसतो. आत्मधिक्काराच्या मिषानें प्रेयसीचाच त्यांत धिक्कार केला आहे. तिच्यावर फसवेपणाचा आरोप अनेक ठिकाणीं आहे. तिचे 'डोळे फसवे' आहेत असेंहि अप्रत्यक्षपणें सूचित केलें आहे. कविनिर्मित नायकाची ही अभिलाषा प्रेयसीने अमान्य केली यांत, तिचा पक्ष आपल्यासमोर नसल्यामुळे, तिचें काय चुकलें हें आपणास सांगतां येत नाही. पण ही रति शेवटपर्यंत एकतर्फीच राहिल्यामुळे परस्परानुरक्ति ही जी शृंगाराची महत्त्वाची अट ती येथें मुळीच पूर्ण झाली नाही. आपणास झिडकारणाऱ्या प्रेयसीची पुनःपुनः मिनता करण्याचा लतकोडगेपणाहि यांत असल्यामुळे व फलतः विप्रलंभाचेंहि अनौचित्य प्रवर्तन यांत झालें असल्यामुळे येथें शृंगाररसाचा केवळ आभास आहे असेंच म्हणावें लागेल.

सध्याच्या लघुकाव्यांत रस पुष्ट होण्याइतकी सामुग्री असण्यास अवकाश नसल्यामुळे हीं भावकाव्यें असतात, त्यांत रसाचा विचार करूं नये असेंहि मत प्रतिपादन करण्यांत येतें. पण अशा भावकाव्यांत देखील बीजरूपाने रसकल्पना असतेच. अपुष्ट अवस्थेंतील रसालाच भाव म्हणतात. तेव्हा या काव्यांत शृंगाररस म्हणा वा रतिभाव म्हणा, यांचा केवळ आभास आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या मतें यांना शोकगीतें म्हणणें अधिक योग्य होईल. कारण या सर्व 'प्रेमगीतां'चें पर्यवसान शोकांत झालें असून तोच भाव शेवटीं अंगी ठरावा इतक्या भरदार अवस्थेंत आहे.

रसाचें स्थान रसिक वाचकाचें वा प्रेक्षकाचें हृदय आहे आणि बसल्या जागीं तें आपल्या कल्पनासामर्थ्यानें रसाचा अनुभव घेतें हें जरी खरें असलें तरी वाङ्मयांत ज्या तऱ्हेचें चित्र रंगविलें असेल तशीच प्रतिमा रसिकाच्या हृदयांत कांही झालें तरी उमटणार. कवितेंत प्रेमवैफल्य रंगविलें असतांना रसिक त्यापासून प्रेमपूर्तीचा अनुभव घेईल किंवा मृत्यूचें चित्र रंगविलें असेल तर रसिकाला अमरत्वाचा साक्षात्कार होईल हें सर्वथा असंभव आहे. म्हणूनच 'अमुक वाङ्मयांत अमुक रस आहे' असें लौकिकार्थानें म्हणण्याची पद्धति आहे. कधी कधी अनौचित्य प्रवर्तनामुळे कवीला (किंवा नाटकांत नटाच्या विपरीत अभिनयामुळे नाटककाराला) अभीष्ट असा रस रसिकाच्या हृदयांत उत्पन्न होत नाही हें खरें. पण त्या जागीं कवीला अभीष्ट नसलेला पण कोणता तरी 'रस'च प्रतिष्ठित होतो हें कांही खरें नाही. फल्गु नदीचें पात्र जसें रेतींत गुप्त होऊन जातें त्या प्रमाणे या रसाचें पात्र अनौचित्याच्या रेतींत कुठे तरी जिरून जातें. एकाच वाङ्मयांशांत परस्पर मैत्री असलेले एकाहून अधिक रस राहूं शकतात व त्यांत अंगांगीभाव संबंधहि राहूं शकतो. म्हणून अनौचित्यानें उत्पन्न होणारा मिश्र भाव आणि उचित असा रससंकर यांत फरक मानावा लागतो.

भिन्न भिन्न रसांची जी वाङ्मयात्मक सामुग्री असते तिचा विचार केला तर इतर रससामुग्रीहून शृंगाररससामुग्रीचें एक निराळेंच वैशिष्ट्य दिसून येतें. हास्य, करुण, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्भुत आणि शांत या रसांत दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीच्या अनुकूलतेची वा प्रतिकूलतेची आवश्यकता नसते. म्हणजे एका अर्थानें या रसांना स्वायत्त म्हणतां येईल. आलंबनाच्या संमतीची यांत स्वतंत्र गरज उत्पन्न होत नाही. वीररसामध्ये मात्र प्रतिपक्षाच्या प्रतिकूलतेची गरज थोडीशी भासते. तथापि उत्साह हा त्या रसाचा स्थायिभाव असल्यामुळे प्रतिपक्षाच्या ठिकाणीं प्रत्यक्ष व्यक्ति नसली तरी चालूं शकतें. शृंगारांत मात्र आलंबनाच्या संमतीची व अनुकूलतेची नितांत आवश्यकता आहे. म्हणून शृंगार हा माझ्या मतें सर्वथैव परायत्त आहे. अभिलाषाप्रसंगीं ती भावना थोडीशी स्वायत्त असली तरी त्याला रसाचें स्वरूप यावयास ती परायत्त झालीच पाहिजे. म्हणूनच ज्या ठिकाणीं प्रियकर व त्याची संकल्पित प्रेयसी हे परस्पर अनुकूल नसतात—किंबहुना ते प्रतिकूल असतात—तेव्हा त्या प्रकाराला एकतर्फी स्वरूप येऊन शृंगाराची निर्मिति होऊं शकत नाही. गडकऱ्यांच्या बहुतेक प्रेमगीतांत असें झालें असल्यामुळे त्यांत प्रेम वा प्रेमजन्य शृंगार याचा केवळ आभास उत्पन्न झाला आहे.

या सर्व प्रेमगीतांतील अभिलाषा प्रथम नायकानें प्रगट केली आहे. 'आदौ वाच्यः स्त्रियो रागः पश्चात्पुंसस्तदिङ्गितैः' असा प्रेमप्रगटीकरणाचा प्राचीन दंडक आहे. त्या विरुद्ध कांही झालें तर त्याला अनौचित्याचें स्वरूप येतें असें त्यावेळीं मानत. आज हा नियम रद्द केला पाहिजे अशी स्थिति असल्यामुळे गडकऱ्यांच्या प्रेमगीतांतील नायकारब्धत्व कोणालाहि आक्षेपार्ह वाटणार नाही.

मात्र अनुकूल नायक व प्रतिकूल नायिका यांचा धिंगाणा या सर्व गीतांत असल्यामुळे, त्यांचा संकलित परिणाम शृंगारांत होऊं शकत नाही. वस्तुतः हिला नायिका म्हणावें किंवा नाही याबद्दलहि संशय उत्पन्न होतो, व नायकत्व हें नायिकाधिष्ठित असल्यामुळें यांतील नायकत्वहि शशशृंगाप्रमाणे आभासात्मक ठरतें. ज्या ठिकाणीं नायक नाही, नायकहि नाही त्या ठिकाणीं मीलन वा विरह यांचेंहि अस्तित्व नाही, म्हणून शृंगाराची प्राप्ति होण्याचें साधनच येथे मुळांत मोडून पडलें आहे. नांव प्रेमगीत व शृंगाराचा अभाव असा विचित्र देखावा यांत असल्यामुळे कवीप्रमाणेच रसिक वाचकहि भिन्न कारणांनीं कां होईना पण शोकाकुल होऊन स्वस्थ बसतो !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

आईचं ऋण

—राम डोके

संध्याकाळची वेळ ! नेहेमीप्रमाणे देवदर्शन आटोपून माई घराकडे परत निघाल्या होत्या. हातांत पूजेचं साहित्य, अंगावर एक पांढऱ्या रंगाचं साधसं नऊवारी लुगडं, नि मुखावर अतिशय शांत नि सोज्ज्वळ भाव अशा त्यांच्या त्या किंचित् ठेंगण्याशा मूर्तीकडे त्या छोटयाशा गावांतील रस्त्यावरून अधून मधून ये जा करणारे लोक आदरानं बघत होते, त्यांना अदबीनं वाट करून देत होते. माईहि कुणाकडे पाहून स्मित करीत, कुणाशीं थांबून दोन शब्द बोलत, कुणाची आस्थेवाईकपणें चौकशी करीत आपल्या संथ चालीनं पुढेपुढे चालल्या होत्या......

माईंना त्या गावांत कोण ओळखत नव्हतं. त्या गावांत नेहेमी बदलून येणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यां-बद्दल, त्यांच्या संबंधित लोकांबद्दल, तेथील अशिक्षित लोकांना एक प्रकारचा आदर वाटत असे. अन् त्या दृष्टीनं अशाच एका ऑफिसराची आई म्हणून माईंना त्या गावांत मानाचं स्थान असणं स्वाभाविकच होतं. पण माईंच्या इतक्या कमालीच्या लोकप्रियतेला आणखी एक गोष्ट कारणीभूत झाली होती. अन् ती म्हणजे त्यांचा स्वभाव ! अधिकारामुळे स्वाभाविकपणें येणाऱ्या अभिमानाचा, अहंकाराचा ओझरता स्पर्शहि त्यांच्या साध्यासुध्या देवभोळया अंतःकरणाला झाला नव्हता. त्यांच्या त्या गावापासून जरा दूर असणाऱ्या सरकारी बंगल्यावर कुणीहि, केव्हाहि जावं. त्याचं माईंनी आपल्या नेहेमीच्या आतिथ्यशील मुद्रेनं स्वागत केलं नाही, त्याला शक्य ती मदत केली नाही, असं सहसा व्हायचं नाही. अन् म्हणूनच त्या गावांत बदलून यायला त्यांच्या मुलाला, बाळाला, तसे फार दिवस झाले नसतांहि त्यांचं नांव ज्याच्या त्याच्या तोंडी झालं होतं. माईंचं जीवन अगदी जवळून पहाण्याची संधि ज्यांना मिळाली असे लोक म्हणत— "फारच वेगळया वृत्तीच्या आहेत माई; अशीं माणसं सहसा आढळायचीं नाहीत या कलियुगांत--"

—कुणी म्हणत, " आपल्या पूर्वायुष्यांत अतिशय वाईट दिवस पाहिले आहेत माईंनी, पण आताच्या चांगल्या काळांत त्यांना त्या दिवसांचा विसर पडला नाही, म्हणूनच त्या दुसऱ्याचीं दुःखं जाणूं शकतात, आपल्या हातानं त्याचीं आसवं पुसूं शकतात.

रस्त्याने जातां जातां, दूर डाव्या बाजूला दिस-णारं तें छोटंसं देऊळ येतांच माई मधेच थांबल्या. त्या देवळाच्या दिशेनं पाहून त्यांनी भक्तिभावाने हात जोडले, अन् त्या पुन्हा वाट चालूं लागल्या. थोडयाच वेळांत त्या स्टेशनजवळच्या पुलावर आल्या व तो उतरून त्या पुढे जाऊं लागणार तोंच बाजूच्या फूट-पाथावरून कुणीतरी बालिश स्वरांत रडतरडत उच्चारलेले ते शब्द त्यांच्या कानावर पडले—

"आईसाऽऽब......गरीबाला पैसा......"

ती कोवळी नि केविलवाणी हांक ऐकतांच माई एकदम दचकल्या. तें रडणं भिकाऱ्यांचं धंदेवाईक रडणं नव्हतं, तर त्यांत एक वेगळीच आर्तता, भेदकता, होती. अन् शिवाय ते शब्द त्यांना अतिशय ओळखीचे अगदी नेहमीच्या ऐकण्यांतले वाटले. त्यांनी त्याच क्षणीं ते जिकडून आले त्या दिशेने नजर टाकली. तों खरंच ! तिथं, त्यांच्या बंगल्यावर नेहमी भिक्षा मागायला येणारं तें सहासात वर्षांचं भिकाऱ्याचं पोर अधूनमधून हुंदके देत त्यांच्याकडे लाचार नजरेनं पहात उभं होतं.

माईंची नजर आपल्यावर खिळलेली आहे हें पहातांच त्या पोराच्या निस्तेज नि किंचित् रोगट वाटणाऱ्या डोळयांत आशेचा एक कोवळा किरण चमकून गेला. नि आपला आवाज कमालीचा केविल-वाणा करीत त्याने पुन्हा याचना केली.

"आईसाऽऽब...कालपासून उपाशी हायजी... एक पैसा ....."

यावेळीं त्या पोराच्या दीनवाण्या आवाजांत थोडीशी धिटाई होती. एकप्रकारचा विश्वास होता'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारण या आईसाहेब इतरांपेक्षा वेगळ्या आहेत हें त्यालाहि माहीत होतं. "आपल्या आंधळ्या आईच्या हातांतील काठी धरून गाणीं म्हणत म्हणत आपण ह्यांच्या बंगल्यावर गेलों की ह्याच आईसाहेब आप-ल्याला बंगल्याच्या फाटकांतून आंत बोलावतात, आपली चौकशी करतात, आपल्या आईकडून मीराबाईचीं दोनचार भजनं म्हणवून घेतात, तिच्या गोड गळ्याची खूप तारीफ करतात...अन् मग आपल्याला रोटी मिळते, पैसा मिळतो..." हें सारं तो विसरला नव्हता, विसरूं शकला नव्हता. अन् म्हणूनच तो आशेनं ओथंबलेल्या नजरेनं त्यांच्याकडे बघत होता.

माईंनी त्याच्या हातावर एक पैसा टाकला अन् त्याची ती आंधळी आई बाजूला दिसली नाही म्हणून सहज चौकशी केली,—"कायरे, तुझी आई दिसत नाही आज ?"

तो प्रश्न ऐकतांच त्या पोरानें बाजूच्या एका आडोशाच्या जागेकडे बोट दाखवीत म्हटलं, "त्यें हाय.....त्ये तिथं, बीमार हाय."

माईंनी त्या दिशेनं बघितलं, तों, त्या पोरानं सांगितलंच म्हणून तिथं ती आंधळी भिकारीण झोपली आहे यावर त्यांना विश्वास ठेवावा लागला, नाहीतर दुरून तें दोनतीन रंगांच्या लक्तरांचं एक मोठंसं गाठोडंच दिसत होतं. तिकडे पहात अर्धवट स्वतःशीं नि अर्धवट त्या पोराला उद्देशून त्या म्हणाल्या,

"बिमार ? काय झालंय हिला ?—"

"बिमार हाय जी...त्यो लंगडा गन्या म्हने, तिले गावांतली बिमारी झाली हाय."

ते शब्द ऐकतांच माई एकदम दचकल्या. गावां-तली बिमारी ! गावांत कॉलऱ्याची भयंकर साथ पसरूं लागली आहे हें त्यांना ऐकून माहीत होतं, अन्...ही आंधळी सारजाही... अरेरे ! हिचं होऊं नये तें झालं तर...हा छोटासा पोरगा...कसं होणार याचं पुढे ?... या लहानशा वयांत आंधळा का होईना, पण याला थोडासा आधार आहे, अन् तोही जर गळून पडला तर—

माईंना खूप वाईट वाटलं, त्यांनी दयार्द्र दृष्टीने त्या पोराकडे बघितलं. तो गोंधळलेल्या नजरेनं त्यांच्या-कडे पहात होता, आपल्या आईला कांहीतरी भयंकर झालं आहे याची त्याला जणु जाणीवही नव्हती. बिच्चारा ! सहा-सात वर्षांचा असेल—नसेल ! त्याला काय कल्पना असणार ! त्यांना त्या चिमुरड्याची, त्याच्या त्या असहाय्य परिस्थितीची भयंकर कीव आली. त्या ताबडतोब त्या भिकारणीच्या दिशेने चालत गेल्या अन् त्यांनी तिला हलकेंच हाक मारली—

"सारजा, ए सारजा......"

आंधळ्या सारजेनं त्यांची हाक चट्कन् ओळ-खली अन् तशा त्या विकल अवस्थेंतहि धडपडून उठण्याचा अयशस्वी यत्न करीत ती खोल स्वरांत पुटपुटली, "आईसाब आपुन......"

अन् त्यानंतर तिला बोलवलं नाही. तिनं आपल्या फाटक्या वस्त्राआड आपल्या तोंडाचा कांही भाग झाकून घेतला. व तिच्या मुखांतून एक अति क्षीण हुंदका बाहेर पडला—

त्या लक्तराआड दडलेलं तें उघडं दैन्य रहातांच माईंच्या अंगावर काटाच उभा राहिला. त्या भयंकर रोगानं किती विलक्षण दैना केली होती तिची ! आधीच अशक्त असलेला तिचा देह त्यानं अगदी विकल करून टाकला होता. तिला दृष्टीनेहि स्पर्श करण्याची माईंना किळस वाटत होती. पण, तिचे ते असहाय हुंदके ऐकून त्यांचं हळुवार हृदय हेलावून गेलं अन् त्या स्वतःशींच हळहळल्या.

"अरेरे ! हा कॉलरा हिचा बळी घेणार काय ? मिराबाईचीं गोड गाणीं आळवणारा हा सुरेल आवाज कायमचा मुका होणार ? अन्—अन्—हें चिमुरडं पोर ? एकमेकांच्या आधाराने रस्त्याने हिंडून, चार गाणीं म्हणून, भिक्षा मागून, हीं दोघं सध्या थोडंसं तरी मिळवतात. पण पुढे ? याच्या अंगावरचं हें फाटकं तुटकं पांघरूण काळानं खस्दिशी ओढून नेल्यावर, ह्या इवल्याशा एकाकी जीवाचं काय होणार ? या लहानशा वयांत हें असंच हिंडणार ? भुकेलं...तान्हेलं ...निराधार...रडत...हुंदके देत...वारंवार झिड-कारणाऱ्या लोकांना लोचटासारखं चिकटत...दीन स्वरांत याचना करीत; एका पैशासाठी !...भाकरीच्या चतकोर तुकड्यासाठी !! छेः छेः, आपण कांहीतरी केलं पाहिजे, या अजाण पोरासाठी.. याच्या आंधळ्या आईसाठी...आणि हा विचार मनांत येतांच त्यांना लगेच आठवलं, की आपल्या बाळाच्या कपाटांत कॉलऱ्या-वरच्या औषधाची एक बाटली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माईंच्या मुलाची वारंवार बदली होई. अन् अधूनमधून तर त्याला अतिशय लहान खेडेवजा गावांत बदलून जावें लागे. म्हणून त्यानें नेहमी लागणारीं बरीचशीं चांगल्यांपैकीं औषधं मुंबईहून मुद्दाम आणून स्वतःच्या संग्रहीं ठेवलीं होतीं. त्यांतच कॉलऱ्यावरचंही एक किंमती औषध आहे हें माईंना त्यावेळीं आठवलं, व सारजाला दिलासा देत त्या हळुवार स्वरांत म्हणाल्या—"सारजा, घाबरूं नकोस हं. मी आता या पोराबरोबर तुझ्यासाठी औषध पाठवतें...त्यानें तुला नक्की बरं वाटेल हं...रडूं नकोस..."

ते शब्द ऐकतांच सारजाला अतिशय भडभडून आलं. माईंच्या दिशेनें आपलं मस्तक वळवून तें जमिनीवर टेकीत ती म्हणाली, "आईसाऽब, लईऽ उपकार...लईऽऽ" आणि बाकीचे शब्द तिच्या शुष्क, फिकट ओठांतून बाहेर येऊंच शकले नाहीत......

त्या पोराला बरोबर घेऊन माई परत निघाल्या. त्यांनी नुकत्याच पाहिलेल्या त्या दृश्यानं त्यांना भयंकर उदास उदास वाटत होतं. अन् रस्त्यानं जातांना त्यांच्या मनांत एकसारखे विचार येत होते—"खरंच किती विचित्र आहे ह्या लोकांचं जिणं! किती विलक्षण! नि किती लाजिरवाणं! ऊन असो, पाऊस असो, थंडी असो— सदा आपले ह्या फुटपाथाच्या आश्रयानं पडलेले! अन् त्यांतल्यात्यांत सारजासारख्या शारीरिक व्यंग असणाऱ्यांचं कसं होत असेल! बिचारी सारजा! अनाथ, अपंग, नि निराधार...अन् शिवाय तिचं तें लहानसं पोर!..."

त्या दोघांबद्दल खूप विचार करतां करतां माईंच्या मनांत आलं—"आपणही एके काळीं अशाच होतों. आपण नि आपला बाळ! अशाच खस्ता खात आपण दिवस काढले—कुठं मोलमजुरी केली... स्वयंपाकपाणी केलं...अर्धपोटी राहिलों नि बाळाला वाढविलं—शिकवलं—मोठं केलं! वैधव्याच्या त्या काळ्या काळांतहि त्या छोट्याशा बाळाच्या रूपानं आशेचा केवढा ठेवा आपल्या उराशीं होता. आपला बाळ खूप शिकेल...खूप मोठ्ठा होईल...कशी सोनेरी स्वप्नं रंगवीत होतों आपण. अन्...अन्....आपल्या बाळानं स्वतःच्या बुद्धिमत्तेनं नि अविश्रान्त मेहनतीनं आपलं स्वप्न खरं करून दाखविलं. आज एका ऑफिसराची आई म्हणून आपण सुखाचं, मानाचं जीवन जगत आहोंत...तसंच या सारजाच्या या पोरालाहि दैव अनुकूल असलं तर हाहि कदाचित् आपल्या आंधळ्या आईला..."

त्यांनी चटकन् वळून आपल्या बाजूनं चालणाऱ्या त्या पोराकडे बघितलं. त्याच्या त्या निस्तेज डोळ्यांतहि एक वेगळ्याच प्रकारची लुकलुक आहे हें त्यांच्या एकदम ध्यानांत आलं नि त्या स्वतःशीं म्हणाल्या—

"देवा, माझ्या औषधानं बिचाऱ्याच्या आईला बरं वाटूं दे. हा पुढे मोठा होऊं दे. आपल्या आंधळ्या आईचं ऋण फेडण्यासाठी...तिला सुखांत ठेवण्यासाठी... जसे माझ्या बाळानं मला चांगले दिवस दाखवले तसे त्यालाहि दाखवूं दे...एवढीच प्रार्थना आहे तुला..." आपल्या बंगल्यावर पोचतांच माईंनी औषधाच्या कपाटांतली ती बाटली चटकन् शोधून काढली अन् ती आणून त्या पोराच्या हातांत देत म्हटलं—

"जा हं बाळ. हें औषध नेऊन आपल्या आईला दे...अन् जपून ने हं बाटली. औषध भारीपैकी आहे..."

त्या पोरानं होकारार्थी मान हलविली, माई काय सांगतात तें लक्षपूर्वक ऐकून घेतलं, व नंतर ती औषधाची बाटली घेऊन तो निघून गेला...

तो निघून गेल्यावर माई आंत येऊन पलंगावर पहुडल्या. बरंचसं अंतर चालून आल्यानं त्यांचं आधीच थकत चाललेलं शरीर बरंच शिणलं होतं. अन् जरा वेगळ्या प्रकारच्या लोकांत नि वातावरणांत जाऊन आल्यानं त्यांचं मनहि बरंच उदास झालं होतं. पण त्या उदास अवस्थेंतहि आपण दोन अनाथ, निराधार मानवांना थोडीशी मदत करूं शकलों ह्या जाणिवेनं त्यांच्या मनाचा एक कोपरा बराचसा सुखावला होता. बरीचशी विषण्णता अन् तिला थोड्याशा समाधानाची किनार असं विचित्र प्रकारचं भावनांचं जाळं त्यांच्या मनांत विणलं जात होतं. अन् त्या स्थितींत त्या पोरानं आपल्या आईला व्यवस्थित औषध दिलं असेल का, तिला त्या औषधानं बरं वाटेल का, तिचा तो गोड आवाज पुन्हा आपल्याला इथं आपल्या बंगल्यावर ऐकूं येईल का, अशा प्रकारचे प्रश्न स्वतःलाच अधून मधून विचारीत त्या अंथरुणावर पडलेल्या असतांना त्यांचं श्रान्त शरीर निद्रेच्या आधीन केव्हा झालं हें त्यांचं त्यांनाच कळलं नाही...

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बऱ्याच वेळानंतर त्यांना कशानं तरी एकदम जाग आली. आजूबाजूला दाट अंधार पसरलेला पाहतांच 'आपण देवाजवळ दिवा लावायला विसरूनच गेलों, असं कसं भलत्याच वेळीं घेरलं आपल्याला झोपेनं' असें पुटपुटत त्यांनी अंथरुणाहून उठण्याचा प्रयत्न केला. पण कशानं तरी त्यांचं अंग अतिशय जड पडलं होतं. अन् त्याच क्षणीं आपल्याला कांहीतरी खूपच विचित्र होत आहे हें त्यांच्या एकदम लक्षांत आलं. त्यांच्या घशाला विलक्षण कोरड पडली होती. अन् साऱ्या गात्रांतली शक्ति जणूं एकदम नाहीशी झाल्यासारखी झाली होती. अन् शिवाय त्यांच्या पोटांतहि भयंकर ढवळल्यासारखं होत होतं. तें पाहतांच कसल्यातरी भीषण शंकेनं त्यांचं मन घाबरून गेलं अन् त्यांनी मोठ्यानं हाक मारली—

"बाऽऽळ"

बाळ नुकताच बाहेरून आला होता. माईंची ती हाक ऐकतांच तो धावतच तिथं आला. त्याला पाहतांच त्या एकदम उद्गारल्या—

"बाळ...कसंतरीच होतंय् रे...पाणी दे...खूप कोरड पडलीय्...अन् पोटांत भयंकर ढवळल्यासारखं..." अन् बोलतां बोलतां मध्येंच त्यांना एकदम जोराची उलटी झाली. अन्...अन् त्यानंतर...

होय ! जें होऊं नये तेंच माईंच्या बाबतींत झालं होतं. त्या गावांत जोरांत सुरू झालेल्या साथीमुळं म्हणा, की त्या आंधळ्या भिकारणीच्या संसर्गानं म्हणा, माईंनाहि कॉलऱ्याचा जोरदार 'अटॅक' आला होता. तें पाहतांच माईंचा मुलगा—बाळ, भयंकर घाबरून गेला. तो तसाच उठून स्वतःच्या खोलींत गेला अन् त्यानं कालऱ्यावरचं तें भारीपैकी औषध काढण्यासाठी कपाट उघडलं तों काय ? त्याला तिथं ती बाटली कांही केल्या सांपडूं शकली नाही. मग मात्र त्याला कांहीच सुचेना. तो धावतच माईंजवळ आला व त्यानं त्यांना घाबऱ्या घाबऱ्या विचारलं—

" आई ! माझ्या कपाटांतली एक औषधाची बाटली तूं ठेवली आहेस का कुठं दुसरीकडे ? "

यावर माई काय बोलणार ? त्यांनी खरं खरं सांगितलं असतं तर बाळ त्यांच्यावर भयंकर रागावला असता. अन् शिवाय आता ती बाटली तरी कुठून आणणार होत्या त्या. तें औषध आतापर्यंत त्या आंधळ्या सारजाच्या पोटांत गेलेलं असणार !... तेव्हा त्या बाळाच्या प्रश्नाला कांहीहि उत्तर न देतां डोळे मिटून तशाच पडून राहिल्या...

त्यांनी जेव्हा कांहीच उत्तर दिलं नाही, तेव्हा बाळनं जें ओळखायचं तें ओळखून घेतलं. त्याला आपल्या आईचा स्वभाव पूर्णपणें माहीत होता. घरांतल्या कितीतरी वस्तु त्या कुणाकुणाला देऊन टाकीत. तशीच हीहि बाटली—पण त्याचा परिणाम कसा विपरीत झाला होता यावेळीं. नेहेमी बाळला त्यांच्या अशा स्वभावाबद्दल कांहीहि वाटत नसे. उलट त्यांच्या या उदार, दिलदार वृत्तीमुळं आपली जीवनांत अधिकाधिक प्रगति होत आहे, आपला सामाजिक दर्जा वाढत आहे, अशीच त्याची समजूत होती. पण आज ! किती विचित्र झालं होतं हें ? या छोट्याशा गावांत ना एखादा चांगलासा डॉक्टर ना दवाखाना ! कसं होणार आता ? कसं होणार !—

डबडबलेल्या डोळ्यांनी बाळनं माईकडे पाहिलं अन् तो हळूच म्हणाला—

"आई, तूं पड हं स्वस्थ. मी आत्ता येतों..."

बाळच्या उदास नजरेपुढे आता एकच आशेचा किरण होता. अन् तो म्हणजे त्या गावांतलं एकुलतं एक बऱ्यापैकी दुकान ! त्याज वाटलं सुदैवानं जर त्यांत कॉलऱ्यावरचं एखादं चांगलंसं औषध मिळून गेलं तर—

तो घाईघाईनं घराबाहेर पडला...

...त्यानंतर बऱ्याच वेळानं औषध घेऊन बाळ परत आला. त्यानं तें माईंना दिलं. अन् तो त्यांच्या उशाशीं बसून राहिला.

अन् काय आश्चर्य ! हळूहळू त्या औषधाचा, माईंवर चांगला परिणाम होऊं लागला. शौचास होण्याचं, उलट्यांचं, प्रमाण कमी कमी होऊं लागलं. अन् रात्रीं १२–१ वाजण्याच्या सुमारास तर माईंनी डोळे उघडून बऱ्याच हुषारीनं बाळला हाक मारली. तें पाहतांच बाळचा आनंद गगनांत मावेना. त्यानं हर्षभरानं आईच्या कपाळावर हात ठेवला व मृदु स्वरांत विचारलं—

"आई, कसं वाटतंय् आता ?"

माईंनी हळूच उत्तर दिलं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"खूपच आराम वाटतोय्."

यावर बाळनं समाधानाचा सुस्कारा सोडला अन् म्हटलं—

"आई, माझं नशीव खूपच थोर आहे. आज तें औषध जर मिळालं नसतं तर—"

"मिळालं ना तें इथल्या दुकानांत ?"

यावर बाळ किंचित् हसून म्हणाला—

"अग इथल्या दुकानांत कसं मिळणार तें औषव ? त्याचं असं झालं. मी मघाशीं बाहेर पडलों तों पहिल्यांदा त्या दुकानाकडे गेलों. तें वन्द झालेलं होतं त्यावेळीं. मग मी त्या दुकानदाराच्या घरीं गेलों अन् त्याला एखादं चांगलंसं औषध आहे का म्हणून विचारलं. पण छेः— त्यानं दिलगिरी प्रदर्शित करून तें नसल्याचं सांगितलं..."

"अं ! मग हें औषध कुठून आणलंस तूं ?"

"अग. तेंच तर सांगतोय्. जेव्हा तें औषध मला कांही केल्या मिळेना तेव्हा मी भयंकर उदास झालों अन् जड मनानं परत यायला निघालों. येतां येतां मी रेल्वेच्या पुलावर आलों—"

"काय ? रेल्वेच्या पुलावर ?"— माईनं मधेच आश्चर्यानं विचारलं.

"होय. तिथं येतांच मला एका बाजूला कांही लोक जमल्यासारखे दिसले. मी सहज त्या बाजूला बघितलं तो बाजूच्या फूटपाथावर कुणाचं तरी एक प्रेत पडलेलं होतं. अन् त्या प्रेताभोवतीं कांही भिकारी गोळा झाले होते. मी जवळून जातांना पाहतांच त्यांच्यापैकी एक भिकारी पुढे झाला अन् त्यानं तिथं मरून पडलेल्या आंधळ्या भिकारणीची करुण कहाणी सांगून मला मदत मागितली. तिचं क्रियाकर्म करण्यासाठी... ती आंधळी भिकारीण कॉलऱ्यानं वारली होती. तिला फक्त एका पांच-सहा वर्षांच्या मुलाशिवाय कुणीहि नव्हतं. अन् दुर्दैव हें की तो मुलगाहि आईसाठी औषध मागायला म्हणून गेला तो त्या वेळेपर्यंत परत आला नव्हता. अन् त्याला हाका मारीत मारीत त्या आंधळीनं प्राण सोडला होता...बिच्चारी !"

"मी त्यांना कांही पैसे दिले व लगेच पुढें निघालों. वरंच अंतर चालून गेल्यावर बाजूच्या अंधारां-तून एक छोटासा मुलगा हळूच रस्त्यावर आला व "साव, दवाई घ्याल का जी विकत...कोनी घेत नाय...आपुन घ्या जी...दोन पैसे द्या...चिवडा खायले ...दोन दिवसांच्या उपाशी हाय् जी" असं म्हणत म्हणत माझ्या मागे धावूं लागला. मी सुरुवातीला आपल्याच तंद्रींत असल्यानं तसाच पुढे-पुढे चाललों होतों. पण अखे-रीस त्यानं रडत रडत केविलवाण्या स्वरांत— "साऽव, खूप भूक लागली जी...एक पैसा द्या—" असं कळवळून म्हणतांच मी भानावर आलों, व त्याच्याकडे पाहिलं, अन् मला आश्चर्याचा धक्काच बसला ! त्या पोराच्या हातांत मी मुंबईहून जें औषध आणलं होतं ना, त्याचीच एक बाटली होती—अगदी पूर्ण भरलेली ! मी ती खस्स्कन् त्याच्या हातांतून हिसकावून घेतली, त्याच्या पसरलेल्या हातांवर पाकीटांतलीं वरीचशीं नाणीं ओतलीं, अन् तस्साच धावत घरीं आलों..."

बाळनं मधेच माईकडे वळून बघितलं. त्यांचे डोळे गच्च मिटलेले होते अन् त्यांतून अश्रूंचा अखंड प्रवाह सुरू होता. आपल्या आईच्या अतिशय भावविवश नि हळुवार मनाची बाळला पूर्ण कल्पना होती. त्यानं कांहीहि न बोलतां त्यांच्या कपाळावर हलकेच हात ठेवला. त्या हाताचा स्पर्श होतांच माईंनी त्यावर आपला हात ठेवून तो घट्ट दावला. त्यांना वरंच बोलायचं होतं, सांगायचं होतं. पण त्यांच्यानं कांहीच बोलवलं नाही. त्यांना जें सांगावयाचं होतं त्या ऐवजी-त्यांच्या दाटलेल्या गळ्यांतून एक हुंदका तेवढा बाहेर पडला !

———

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नववधू प्रिया मी—'

श्री. माधव गोपाळ जामदार, बी. ए. नागपूर

'नववधू प्रिया मी'—हें कै. राजकवि भास्कर रामचंद्र तांबे या प्रसिद्ध कवींचें रमणीय गीत आहे. वाच्यार्थानें शृंगारिक पण परमार्थाने पारमार्थिक असलेल्या या गीताचा दोनपैकीं कोणत्याहि अर्थानें आस्वाद घेतला तरी सारख्याच निरामय काव्यनंदाचा लाभ होतो, यांतच या गीताचें सारें यश सामावलें आहे. या गीताचें स्वरूप असें श्लिष्ट असल्यामुळेच तें एक चटकदार नाटचगीत आहे तसेंच सरस भावगीतहि आहे.

राजकवि तांबे हे महाराष्ट्रांतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नाटचगीतकार होऊन गेले. कारण स्वतःच्या विचार विकारांइतकेंच दुसऱ्यांच्या विचार विकारांशीं त्यांचें संवेदनाक्षम मन समरस होत असे. दुसऱ्या व्यक्तीच्या भावनिक अनुभूतीचा आविष्कार ते 'अति हळुवारपण चित्ता आणूनिया' करीत असत. नाटचगीताच्या निर्मितीकरिता आवश्यक असणारा हा स्वभावगुण त्यांच्याजवळ असल्यामुळेच ते एकाहून अधिक चटकदार नाटचगीतें लिहूं शकले. कवि जेव्हा पात्राच्या विकारविचारांशीं तदाकार होऊन अनुरूप अशा सरस कल्पना व्यक्त करणाऱ्या मार्मिक शब्दांच्या सहाय्यानें त्या विचार विकारांचा पात्रमुखी आविष्कार करतो तेव्हा नाटचगीत निर्माण होतें. तांब्यांचा स्वभावधर्मच वर दर्शविल्याप्रमाणे असल्यामुळे त्यांना ही नाटचगीतलेखनाची कला सिद्धहस्त होती. त्यांतल्यात्यांत स्त्रियांच्या कुसुमकोमल मनांतील नानाविध भावछटांचें इतकें मार्मिक व सूक्ष्म चित्रण त्यांनी आपल्या मधुरगेय कवनांतून केलें आहे की, रतलामच्या श्री. कुमठेकरांच्या भगिनींनी खुद्द त्यांच्याजवळ, "तुम्हाला स्त्रीहृदयाची ओळख स्त्रियांपेक्षा अधिक कशी?" अशी साश्चर्य विचारणा केली होती. (तांबे, व्यक्ति आणि कला.) तांब्यांच्या नाटचगीतांच्या उत्तमपणाची साक्ष पटवून देण्याला याच्याइतका चांगला अभिप्राय दुसरा कोणचा असूं शकेल?

'नववधू प्रिया मी–' या चटकदार नाटचगीतांत सासरीं जायला निघालेल्या नववधूच्या बावरलेल्या मनःस्थितीचें हुबेहूब चित्र रेखाटलें आहे. "असलें काव्य (नाटचगीत) तत्काळ समजावें याकरिता आधी त्यांतील 'पात्रां'संबंधी व 'प्रसंगा'संबंधी तात्पुरतें 'सूतोवाच' हवें" (आधुनिक मराठी कविता, पान ३२) प्रस्तुत नाटचगीताच्या—

'नववधू प्रिया मी बावरतें
लाजतें पुढे सरतें फिरतें'—

या ध्रुवपदांत सासरीं जावयास निघालेली नववधू बावरून गेली असून यौवनसुलभ लज्जा आणि भय या संमिश्र भावनांमुळे तिचा एक पाय दारांत तर दुसरा घरांत आहे असा विषयप्रवेश आहे. या दोन ओळी वाचतांच जिच्या डोळयांच्या भरल्या डोहांत मीलनाची आतुरता आणि वियोगाची आर्तता प्रतिबिंबित झाली आहे, जिच्या मोहक मुखमंडलावर लज्जा आणि संकोच यांचें युगुल अदृश्य रूपानें विलसत आहे, जिच्या धडधडत्या वक्षःस्थलावरोवर त्यावर अलंकृत झालेलें नवखें मंगळसूत्र आरोहावरोह करीत आहे आणि जिचीं सोन्यानें भरलेलीं थरथरतीं पाउलें घराच्या उंबरठयावर रेंगाळत आहेत अशा नववधूची करुणरम्य मूर्ति रसिकाच्या नजरेसमोर उभी राहाते व त्याचें हृदय भगिनीप्रेमानें उचंबळून येतें. तो तिच्या द्विधा मनःस्थितीचें वर्णन करणारी पुढील कडवीं वाचूं लागतो. तांब्यांची ही नववधू भातुकलीच्या खेळांत रमणारी चिमुरडी परकरी पोर नाही. लावण्याच्या प्रांतांत तिनें पदन्यास केला आहे. आणि यौवनाची चाहूल ऐकून तिच्यांतील बाल्याचीं कवुतरें केव्हाच उडून गेलीं आहेत. पति हाच आपला प्राणसखा आहे हें तिला कळतें, तरी पण—

'कळे मला तूं प्राणसखा जरि
कळे तूंच आधार सुखा जरि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुजवांचुनि संसार फुका जरि
मन जवळ यावया गांगरतें '

हवाहवासा वाटणाऱ्या पण नवख्या अशा इसमाबरोबर जातांना तिचें मन गांगरून गेलें यांत काय नवल? माहेरची प्रेमळ माया तोडून सर्वस्वीं नव्या जगांत जाणें हितप्रद व अटळ असलें तरी इतकें का सोपें आहे?—

' मला येथला लागला लळा
सासरिं निघतां दाटतो गळा
बागबगीचा येथला मळा
सोडितां कसें मन चरचरतें ।'

तिच्या जीवनाचे सारे धागेदोरे वत्सल मातापित्यांच्या व प्रेमळ भावंडांच्या जीवनांत गुंतलेले असतात. कौमार (र्य ?) कालांतील कलात्मक जीवनाची बाग आणि आईबाप, भाऊबहिणी यांच्या प्रेमाने बहरलेला मळा यांचा लळा एका पळांत नाहीसा करून सर्वस्वीं नव्या अशा सासरची कांटेरी वाट बघतांना तिचा गळा कसा दाटून येतो! तिचें मन कसें चरचरतें! 'सकल स्वजनमाया तोडितां तोडवेना' अशी समर्थांसारख्या वैराग्यशील राष्ट्रसंतांची जिथे असमर्थ अवस्था तिथे या नववधूची अशी करुणासंकुल मनःस्थिति झाल्यास नवल तें काय? चाळीस वर्षां-पूर्वीच्या बालविवाहाच्या युगांत संसाराची 'भरली घागर' शिरावर निमूटपणें वाहणाऱ्या अजाण बाळीला 'सासरच्या वाटे वोटवोट कांटे। माहेरच्या वाटे हळदकुंकू दाटे' असें खरोखरच वाटत असें. पण याच्या अगदी उलट प्रगत युगांतील पतिराजांच्या लाडक्या नवशिक्षित राणीला त्यांचा क्षणिक विरहहि काटचा-सारखा बोचतो म्हणून 'सासरच्या वाटे हळदकुंकू दाटे। माहेरच्या वाटे वोटवोट काटे' असें वाटत असतें'; असें विनोदबुद्धीने म्हटलें तरी प्रथम सासरीं जायच्या वेळेला तरी आजच्या जाणत्या नववधूलाहि सासरची वाट कांटयांनी भरलेलीच खास वाटत असली पाहिजे! असें असूनसुद्धा माहेरच्या मायेचीं सारीं प्रेमळ बंधनें झुगारून देऊन मोकळें व्हावें अशी तळमळ तिच्या संगमोत्सुक जिवाला लागलेली असते.

'जीव मनीच्या मनीं तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळें
पळत निघावें तुजजवळ पळें "

परंतु तेवढा धीर तिला होत नाही. इतके दिवस प्रिय-वल्लभाच्या प्रतिमेकडे पाहून व तिला हृदयाशीं धरूनच ती खुळी संतोष मानीत असली तरी पतीचें घर तेंच आपलें खरें घर आहे, आणि माहेरच्या वियोगाची कळ ही केवळ पळभराची आहे हें तिला पटतें. म्हणून ती आपल्या प्रियवल्लभाला विनविते—

'अतां तूंच भय लाज हरी रे!
धीर देउनि ने नवरी रे
भरतिल भरोत नेत्र जरी रे
कळ पळभर मात्र, खरें घर तें"—

या चरणांवर भाष्य करितांना मर्मज्ञ रसिक कै. माधव ज्यूलियन म्हणतात. स्त्रीपुरुष संबंधांत निर्णयात्मक गोष्ट पुरुषाने करावयाची असते. दाट परिचयान्ती विवाह होऊं लागल्यानंतर उपर्युक्त कवितेंत रेखाटलेलें चित्र तितकेंसें जिव्हाळ्याचें व परिणामकारक वाटणार नाही. तथापि पाश्चात्य समाजांत अजूनहि प्रेमाचा आविष्कार करून पाणिग्रहणाची याचना पुरुषानेच करावयाची असते." (काव्यविहार पान ५६) पण ही गोष्ट विशिष्ट समाजापुरतीच मर्यादित कां? लज्जा हा स्त्रीमनाचा अलंकार आहे. आणि स्त्रिया कितीहि शिकल्या तरी प्रेमाच्या संबंधांत प्रथम पुढाकार घेऊन लाजेने चूर झालेल्या प्रेयसीची हनुवटी अनुरागाने आपल्या हाताने वर करून तिचें 'मदनरंग-सदन' असें 'वदन' पाहण्याचा मान पुरुषाचाच आहे; अशी कबुली नवविवाहित आंग्लविद्याविभूषित युवती जनांत द्यायला लाजल्या तरी स्वतःच्या मनांत मात्र स्पष्ट दिल्याशिवाय राहाणार नाहीत. आणि म्हणूनच या गीतांतील चित्र नेहमीच जिव्हाळ्याचें व परिणाम-कारक वाटेल. नववधूच्या काव्यमय मनःस्थितीचें चित्र तांब्यांसारख्या रससिद्ध कलावंताने रेखाटल्यामुळे तें नितांतरमणीय बठलें आहे. रसानुकूल शब्दयोजना करितांना तांब्यांना केशवसुतांप्रमाणे 'शब्दांनो! मागुतें या' अशी मनधरणी करावी लागली नाही. उलट प्रतिभाच त्यांच्यावर मोहीत झाली. कै. माधव ज्यूलियन म्हणतात—

"शोधाया जा शब्द कशाला?
मोहुनि धावे प्रतिभावाला
संगीतासीं रंग मिळाला
— चित्रमालिका पहा नवी"
(स्वप्नरंजन पान १३६)

प्रस्तुत मधुरगेय नाट्यगीताची शब्दयोजना इतकी रसानुकूल आहे की नववधूच्या मनांतील अदृश्य

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावच या गीतांतील शब्दांच्या रूपाने साकार झाले आहेत असें वाटतें नाटचगीताची तात्विक चर्चा करीत असतांना प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, "नाटचगीतें रचण्याकरिता कवि हा मनकवडा हवा. त्याला दुसऱ्याचें मनोगत ओळखतां आलें पाहिजे व तें त्या माणसाच्या शब्दांत बोलून दाखवितां आलें पाहिजे..........थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कवीला त्या दुसऱ्या व्यक्तीचें सोंग हुबेहूब वठवतां आलें पाहिजे. सोंगसंपादणींत कवीनें स्वतःचें व्यक्तित्व अबाधित राखलें पाहिजे, हें विशेष आहे" (आ. म. कविता, पान ३२) प्रस्तुत नाटचगीताच्या आतापर्यंतच्या विवेचनावरून तांब्यांनी नववधूची बतावणी किती बेमालूम केली आहे हें आपल्या सहज लक्षांत येईल. शिवाय त्यांचें स्वतःचें व्यक्तित्व त्यांत लवमात्रहि प्रतिबिंबित झालेलें नाही. त्यामुळे या गीतांतील बोल अन् बोल त्या नववधूचा आहे असेंच आपल्याला वाटतें.

प्रस्तुत गीत हें नाटचगीत नसून तें एक प्रासादिक गूढगुंजनात्मक भावगीत आहे; त्यांत नववधूच्या गोंधळलेल्या आर्त आणि आतुर मनःस्थितीचें चित्रण केलेलें नसून कवीच्या तत्सदृश मनःस्थितीचेंच तें गूढ असें भावचित्र आहे; या दृष्टीने जर आपण या गीताचा आस्वाद घेतला तर मात्र त्यांतील प्रत्येक शब्दांत कवीचें स्वतःचें व्यक्तित्व उमटलें आहे असें आपल्यास दिसून येईल. आणि हाच या गीताचा विशेष आहे. 'वाच्यार्थानें शृंगारिक पण परमार्थाने पारमार्थिक असलेल्या या गीताचा कोणत्याहि अर्थानें आस्वाद घेतला तरी सारख्याच निरामय काव्यानंदाचा लाभ होतो' असें विधान मी प्रस्तुत लेखाच्या प्रस्तावनेंत केलें आहे तेंहि याच अर्थानें. आता पारमार्थिक आणि दुसऱ्या अर्थानें या गीताचें रसग्रहण करण्यापूर्वी काव्यांतील गूढ वादाबद्दल तांब्यांची स्वतःची भूमिका काय होती हें समजून घेणें इष्ट आहे. गूढगुंजन कांही महाराष्ट्र कविपरंपरेला नवखें नाही, इतकेंच आहे की, ऐहिक सुखाच्या ध्येयाने प्रेरित झाल्यामुळे आजच्या वाचकांची, 'अतींद्रिय रहस्याचा शोध करण्यास लागणारी मनोभूमिकाच नष्ट झाली आहे.' तांब्यांच्या मतानें, "विश्वान्तर्गत रहस्याचें भावनात्मक आकलन झालें की गूढवाद निर्माण होतो. गूढतेंत कोणत्याहि प्रकारचें कोडें नसतें, तर मनाची स्तिमित अवस्था असते" (राजकवि तांबे —ना. वा. पराडकर) आणि या दृष्टीने विचार केला तर त्यांच्या कवितेंत गूढगुंजन आहे.

'कन्या सासुऱ्यासी जाये
मागे परतोनी पाहे ।
तैसें झालें माझ्या जीवा
केव्हा भेटसी केशवा ।।'

या तुकारामाच्या आर्त अभंगांतील काव्यमय कल्पनेचा सुंदर विस्तार या कवितेंत तांब्यांनी केला आहे. मरणाच्या दारांतून सर्वस्वीं अज्ञात असलेल्या परमात्म्याकडे जात असतांना जीवाची जी मनःस्थिति होते ती नेमकी नववधूसारखीच असते. याच मनःस्थितीच्या अनुभूतीचें चित्रण नववधूचें प्रतीक घेऊन कवीने रेखाटलें आहे. अर्थात् शब्दांची कोणत्याहि प्रकारची ओढाताण न करतां अर्थ कळतो हें विशेष आहे. तांब्यांच्या कवितेंत हा जो गूढवाद शिरला आहे तो त्यांच्या जीवनानुभूतींतून स्वाभाविकपणे आला आहे. या संदर्भांत त्यांची स्वतःचीच साक्ष अधिक उद्बोधक ठरेल. त्यांच्या काव्यरत्नांचे 'पारखी,' कवि माधवदेव यांना दिनांक २४ एप्रिल रोजीं पाठविलेल्या पत्रांत तांबे लिहितात—" It is a remarkable feature of my poetry (that) it has grown with my life....Now when literary persons have dropped round me like petals of blown rose, when disease and distress and ebility have established their quarters in me, when like a canol caught in a whirl of storm, my family affairs are tossed hither and thither, is it wonder that my eye should dwell upon the distant skirts of life beyond and the great to be ?....what wonder if महाप्रस्थान comes out now ? " (साहित्यविषयक पत्रव्यवहार—पान २१–२२) त्यांच्या जीवात्म्याला लागलेल्या परमात्म तत्त्वाच्या भेटीच्या तळमळीचा आविष्कार करतांना त्यांना 'कृतान्तो वाकान्तः समाजनि न भेद प्रथमतः' असें वाटणें स्वाभाविक आहे. आणि म्हणूनच त्यांनी नववधूच्या यथार्थ प्रतीकाच्या साहाय्यानेच आपल्या आंतरिक तळमळीचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आविष्कार केला आहे. श्री. मर्ढेकरांची भावना-निष्ठ समानता हीच असावी. या गीताचा दुसरा विशेष हा की तें संपूर्णपणें वैयक्तिक असूनहि सामूहिक आहे. म्हणजे व्यक्ती-समष्टीच्या समान अनुभूतींतून तें जन्माला आलें आहे. आणि म्हणूनच ते चिरंतन राहील यांत शंका नाही. परमात्म्याच्या भेटीसाठी तळमळणाऱ्या जीवाला खात्री असते की मरणाच्या दारांतून जाणें अटळ आणि हिताचें आहे. पण वेळ येतांच मोहांत गुंतून गेलेल्या त्या जीवाची साहजिकच तगमग होते--

'मला येथला लागला लळा
सासरि निघतां दाटतो गळा
वागवगीचा येथला मळा
सोडितां कसें मन चरचरतें--'

तांब्यांना जीवनाचा कधीच उबग आला नाही. त्यांचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन पूर्णपणें निर्मळ होता. ते आपल्या एका पत्रांत म्हणतात-- 'I look upon the visible world as the expression of joy itself......Sorrow is only foreign to it......the narrow limitations of the जीव create sorrow or pain. Sorrow is thus of our making." [राजकवि तांबे पान ८८] अनुरूप पत्नीच्या संगतींत त्यांचा संसारहि सुखाचा झाल्यामुळे गोविंदाग्रजांप्रमाणे-

'हातीं संसाराची माती
मनिच्या आशा मनींच खाती
भूतकाळचीं भूतें रडतीं
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढती शून्याचें मैदान-"

असे उदास निःश्वास न सोडतां--

"सुफलित झालें गे सखि जीवित !
युगानुयुग ज्या त्रिभुवन शोधी
निधान तें तव नयनिं मिळालें
जन्मजन्मिचें क्षुधाव्यथित मन
लाभुनि तुज आकण्ठचि धालें"

असे समाधानाचे उद्गार त्यांनी वाढले आहेत. त्यांचें कलात्मक जीवनहि यशस्वी झालें हें महाराष्ट्रीय रसिकांना माहितच आहे. मग हे सारें सोडून जाण्याचा विचार मनांत आल्यावर त्यांचा गळा दाटून आला तर त्यांत अस्वाभाविक असें काय आहे? तरी सुद्धा त्यांचे "नेत्र पैलतीरीं लागले" आहेत. संसाराचीं बंधनें तोडून स्वतंत्र व्हावें असें त्यांच्या जीवाला वाटतें. इतकीं वर्षें परंधामास (God who is our home) जावयाचें आहे हें माहीत असूनहि बाहुल्या मूर्तींना देव समजून त्यांना संपुटांत ठेवून हारतुऱ्यांनी सजविण्यांत त्यांचा जीव समाधान मानीत असे. पण आता त्यांच्या अधीर जीवाला धीर धरवत नसूनहि परमात्म्यांकडे जाण्याचा धीर होत नाही. म्हणून अत्यंत लीनतेने ते परमेश्वराला विनवितात--

'अतां तूंच भय लाज हरी रे !
धीर देऊनी ने नवरी रे,
भरतिल भरोत नेत्र जरी रे,
कळ पळभर मात्र खरें घर तें ! '

शेवटी प्रस्तुत गीताचें सर्व दृष्टींनी रसग्रहण केल्यानंतर असें निःसंदिग्धपणें म्हणावयास हरकत नाही की, आधुनिक मराठी कवितेंत या गीताचा दर्जा फार मोठा आहे. ध्रुवपदांत उत्स्फूर्त झालेल्या भावनेचा समतोलपणा शेवटपर्यंत कायम टिकला आहे. विशेष चिकित्सेने पाहिल्यास 'मला येथला लागला लळा' आणि 'चित्र तुझें घेऊन उरावरि' हीं दोन कडवीं विशेष सूचक आणि अर्थगंभीर वाटतात 'मला येथला लागला लळा' या कडव्यांतील कल्पना 'पोषाख नवनवा मला दिला' या गीतांतहि पुनरुक्त झाली आहे. या चिरस्मरणीय गीताला साकार करण्याचें भाग्य तांब्यांच्या अत्यंत लाडक्या 'नववधूला' (जातीला) लाभलें आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. समारोप करतांना या गीताबद्दल एका तांबे-भक्ताच्या शब्दांत यथार्थपणें असें म्हणतां येईल की--

"ध्वनी सूचक त्यांतून निघे ऐसा
परब्रह्मांतुन चिदानंद जैसा
अर्थ केवळ ये अवगतां मनाला
कळे मधुमधुता कथुन कां कुणाला ?"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. १९-७-५३ रोजीं सकाळीं ८-३० वाजतां केन्द्रीय कार्यालयांत संघाध्यक्ष प्रा. म. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली भरली. सभेंत खालील महत्त्वाचें कामकाज झालें.

१. सरचिटणिसांनी दिनांक १२-४-५३ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. अमरावती संघशाखेचे सरचिटणीस श्री. म. बा. देवघरे यांना 'संघशाखा उपनियम समिती'चे आमंत्रक म्हणून नियुक्त करण्यांत आलें.

३. सरचिटणीसांनी गेल्या तीन महिन्यांतील कार्याचा लेखी वृत्तांत सभेला सादर केला. त्यांत त्यांनी मागील वर्षाच्या ठरावाप्रमाणे, मंदिररचना समितीला परतफेडीच्या अटीवर सध्या चार हजार रुपयांची रकम चालू निधींतून देण्यांत आली असें सांगितलें. तसेंच एक जादा संघलेखक व छोटा चपराशी ठेवण्यांत आला, असें सांगितलें. नियुक्त झालेल्या इतर उपसमित्यांच्या झालेल्या कामाची माहिती निवेदन केली.

४. सागरच्या श्रीमती मालतीबाई श्रीखंडे यांचें 'मराठी भाषा प्रवेशिका' हें हिंदी पुस्तक, निविदा समाधानकारक न आल्यास, विदर्भ साहित्य संघाने स्वतः १ सप्टेंबरच्या आंत छापून प्रकाशित करावें, असें ठरलें.

५. सरचिटणिसांनी एप्रिल-मे व जून १९५३ या तीन महिन्यांचा खातेवार जमा-खर्च सभेला सादर केला.

६. कार्यकारी मंडळाच्या आदेशाप्रमाणे 'युगवाणी'चे संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी संपादकमंडळावर नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या नियुक्तीला कार्यकारी मंडळाने मान्यता दिली. याशिवाय या सभेंत, श्री. म. बा. देवघरे, श्री. त्र्यं. गो. देशमुख, सौ. उषाताई कोलते व सौ. इंदुमती शेवडे या चार व्यक्तींची कार्यकारी मंडळाने संपादक मंडळावर नेमणूक केली.

७. परीक्षा समितीचे संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी कार्यकारी मंडळाच्या आदेशाप्रमाणे नियुक्त केलेल्या परीक्षासमितीवरील नांवांना मान्यता देण्यांत आली. याशिवाय या सभेंत, श्री. द. शं. फडके व श्री. ना. ग. डबीर यांना परीक्षासमितीवर घेण्यानें ठरलें.

नंतर परीक्षा समितीचे संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी परीक्षा समितीने आजपर्यंत केलेल्या कामाचें लेखी निवेदन केलें. या वर्षाला परीक्षा समितीसाठी असलेल्या १००० रु.च्या रकमेपैकी आज सुमारे ७५०रु. खर्च झाले असें सांगून अंदाजपत्रकांतील रकम अपुरी पडेल म्हणून ५०० रु. ची अधिक मागणी केली. कामाचा व्याप वाढता आहे, अनेक केन्द्रें निर्माण केलीं जात आहेत व सोयीच्या दृष्टीने पत्रकें वगैरेहि काढणें क्रमप्राप्त झालें आहे, असेंहि त्यांनी खुलासेवार सांगून, पुढील खर्चाचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखी अंदाज सभेला सादर केला. घटनेप्रमाणे एवढी रकम मंजूर करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला नसल्याकारणाने ५०० रु. ला पुढील साधारण सभेची मंजुरी घ्यावी व तशी कार्यकारी मंडळाने शिफारस करावी, असें ठरलें.

८. उरलेल्या उपसमित्यांचा प्रश्न सभेपुढे आला. परिभाषा समिति, साहित्यसंस्था सहकार्य समिति, कार्यक्रम समिति, शुद्धलेखन समिति व सीमा समिति या पाच उपसमित्यांची नियुक्ति करण्यांत आली.

९. भंडारा शाखेकडून वि. सा. संघातर्फे होणाऱ्या परीक्षांसंबंधीचा व तसेंच आजीव सभासदत्वासंबंधीचा ठराव विचारांत घेण्यांत येऊन परीक्षांसंबंधींचा ठराव परीक्षासमितीकडे व आजीव सभासदत्वासंबंधीचा ठराव घटनाविषयक प्रश्न समितीकडे विचारार्थ पाठवावा, असें ठरलें.

१०. 'Who is who' या पत्रकासंबंधी वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेला ठराव सभेपुढे मांडण्यांत आला. त्यावर विचार होऊन या प्रकरणाची चौकशी करून आपला अहवाल पुढील कार्यकारिणीच्या बैठकीला सादर करण्यासाठी खालील मंडळ नियुक्त करण्यांत आलें:—

अध्यक्ष : प्रा. भ. श्री. पंडित

सभासद : न्यायमूर्ति के. तु. मंगळमूर्ति; श्री. ना. ग. डवीर; श्री. पां. बा. गडकरी; श्री. ना. खं. तिरपुडे; श्री. ना. रा. शेंडे—अ—सभासद (आमंत्रक)

११. गोंदिया शाखेचे चिटणीस श्री. ना. ग. डवीर यांचें दि. २–७–५३ चें 'युगवाणी'च्या जलै ५३ च्या अंकांतील 'थोडेंसें आत्मनिरीक्षण' या स्फुटांतील मजकुरासंबंधीचें पत्र विचारांत घेण्यांत आलें. संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी स्फुटासंबंधीचा खुलासा करून वि. सा. संघाचे सभासद अधिकाधिक वाढविण्यांत यावे या हेतूनेच हें स्फुट लिहिलें गेलें आहे असें सांगितलें. त्यावर थोडी चर्चा होऊन श्री. डवीर यांचें पत्र संपादकांकडे विचारार्थ पाठवावें असें ठरलें.

१२. समित्या उपसमित्यावरील बाहेर गांवच्या सभासदांना येण्याजाण्याचा प्रवासखर्च द्यावा की काय या प्रश्नाचा विचार करण्यांत येऊन, घटनेंत तरतूद नसल्याने प्रवासखर्च देतां येत नाही, असें ठरलें.

* *

डॉ. खेडकर व श्री. ताहेरअली यांची वि. सा. संघाला भेट

दि. २१ जून ५३ रोजीं विदर्भ प्र. कॉ. कमिटीचे अध्यक्ष आणि संसदेचे सदस्य डॉ. खेडकर व श्री. अब्दुल्लाभाई ताहेरअली यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्यावेळीं त्यांनी वि. सा. संघाचें काम पाहून समाधान व्यक्त केलें आणि संघाच्या कार्याला शक्य ती मदत करण्याचें आश्वासन दिलें.

श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर यांची भेट व देणगी

श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर यांनी दि. ११ जुलै ५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. गडकरी-स्मारक समितीतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं त्यांनी विदर्भसाहित्य मंदिराची एकंदर योजना आणि त्याचें सध्या चालू असलेलें बांधकाम पाहून आनंद व्यक्त केला.

श्रीमती बकुळाबाई अभ्यंकर यांनी वि. सा. मंदिरांतील गडकरी दालनाला रु. १००० ची देणगी देण्याचें आश्वासन दिलें; त्यापैकी रु. ५०० त्यांनी रोख दिले आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

श्री. प्रभाकर पाध्ये यांची भेट व भाषण

दि. १७ जुलै ५३ रोजीं सांस्कृतिक स्वातंत्र्य परिषदेच्या भारतीय समितीचे चिटणीस, 'नवशक्ति' दैनिकाचे माजी संपादक, श्री. प्रभाकर पाध्ये यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं वि. सा. संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यानंतर त्यांचें 'साम्यवाद व बुद्धिजीवि' या विषयावर विचारपरिप्लुत भाषण झालें.

* *

धामणगांव

परिक्षाकेंद्र प्रतिवृत्त

धामणगाव केन्द्रांतून जानेवारी १९५३ मध्ये वि. सा. संघाच्या परीक्षेला बसलेल्या विभिन्न परीक्षार्थींना प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ गो. स. कॉमर्स कॉलेज, वर्धा येथील प्रा. वनमाळी यांच्या हस्तें थाटांने पार पडला.

श्री. पुं. कठाळे

केन्द्राधिकारी, सेठ फत्तेलाल लाभचंद हायस्कूल,

धामणगांव–रेल्वे

* *

अमरावती संघशाखा वृत्त

ता. १० मार्च १९५३ ५३ रोजीं शाखेची वार्षिक साधारण सभा झाली. सभेंत सन १९५२–५३ सालचा अहवाल चिटणीस श्री. तांबी यांनी वाचून दाखविला व तो स्वीकृत करण्यांत आला. त्यानंतर निवडणुकी होऊन नवीन वर्षाकरिता खालीलप्रमाणे कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

अध्यक्षः—श्री. नानासाहेब बामणगांवकर

उपाध्यक्षः—श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी व श्री. श्री. स. पेंढारकर

चिटणीसः—श्री. म. बा. देवघरे

सहचिटणीसः—कु. वनमाला देशमुख व श्री. अशोक अंबाडकर

सभासदः—श्री. नारायण तांबी, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, द. शं. फडके, कृ. ना. नाफडे, प्रा. मा. ल. व्यवहारे, प्रा. पु. गो. निजसुरे, के. दे. देशपांडे, वा. शि. काळे, सौ. भानुमती सिंह, प्रा. ना. ल. पोतदार, सौ. विमल देशमुख, प्रा. सुरेश डोळके, मदनलाल भट्ट व डी. जी. अनगळ.

प्रा. न. र. फाटक यांचें भाषण

मोझरी संमेलनावरून परत जातांना नुकतेच चीनवरून परत आलेले प्रा. न. र. फाटक, मुंबई, यांचें ता. १६ मार्च ५३ रोजीं 'नव चीन सुखी कसा झाला' या विषयावर जाहीर व्याख्यान करण्यांत आलें.

शिक्षण–मंत्र्यांची भेट

म. प्र. चे शिक्षण–मंत्री श्री. पु. का. देशमुख ह्यांनी ता. ६ मे ५३ रोजीं शाखेस भेट दिली. शाखेतर्फे त्यांचें स्वागत करण्यांत आल्यावर राजभाषा अधिनियम, डॉ. रघुवीरकृत परिभाषा व त्यांचा शिक्षण संस्थांतून वापर यासंबंधी व इतर शैक्षणिक क्षेत्रांतील अडचणी त्यांना निवेदन करण्यांत आल्या. शिक्षण–मंत्र्यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणांत असें आश्वासन दिलें की, "राजभाषा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अधिनियमाच्या अंमलबजावणींत मराठीवर कोणताही अन्याय होणार नाही. या अधिनियमांतील ४ थ्या कलमांत आपल्या संघाच्या सूचनेप्रमाणे आवश्यक बदल करण्याचें सरकारतर्फे जाहीर झालेंलें आहे. मध्यप्रदेशांत हिंदी व मराठी या दोन्ही प्रादेशिक भाषांना सारखेंच स्थान व दर्जा राहील." परिभाषेच्या बद्दल त्यांनी सांगितलें की "विद्यापीठांतून डॉ. रघुवीरकृत शब्दांचा वापर सुरू होण्यास सरकार कारणीभूत नसून विद्यापीठानेच तो निर्णय घेतलेला आहे. माध्यमिक शाळांतून कोणती परिभाषा सुरू करावयाची हा प्रश्न सेकंडरी एज्युकेशन बोर्डासमोर मांडण्यांत येईल व त्यासंबंधींचा निर्णय तें बोर्ड घेईल. राज्यकारभारविषयक शब्दकोश तयार करण्याचें कार्य तज्ञांच्या सहकार्याने सुरू आहे." ह्यानंतर इतर किरकोळ प्रश्नांसंबंधी चर्चा होऊन हा कार्यक्रम संपला.

पुढील वर्षासाठी कार्यक्रम

ता. ७ एप्रिल रोजीं नव्या व जुन्या का. मं. ची सभा झाली. सभेस संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित खास निमंत्रणावरून उपस्थित होते. पुढील वर्षासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यांत आला:—

(१) पारिभाषिक शब्दांबद्दल डॉ. रघुवीर ह्यांचे शब्द व तदर्थी व्यवहारांत रूढ झालेले शब्द ह्यांचा संग्रह करावा व ते शब्द युगवाणींतून प्रसिद्ध करावेत. ह्यासाठी श्री. श्री. स. पेंढारकर व प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांची समिति नेमण्यांत आली.

(२) परीक्षा:—साहित्य संघाच्या परीक्षा लोकप्रिय व्हाव्यात म्हणून या परीक्षांत अमरावतींतून प्रथम येणाऱ्यास बक्षिसें देण्यासाठी श्री. श्री. स. पेंढारकर यांनी ४५ रु. ची देणगी जाहीर केली. हीं बक्षिसें कशीं वाटावयाचीं हें पुढे ठरविण्यांत येईल. तसेंच परीक्षांना जास्त संख्येत विद्यार्थी बसविण्यांत यावेत.

(३) शाखेच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं जिल्हासंमेलन भरविण्यांत यावें व त्यावेळीं शाखेतर्फे एखादें पुस्तक प्रकाशन करावें.

(४) मागील वर्षीप्रमाणे यंदाही नवरात्र व्याख्यानमाला संघटित करावी. शिवाय व्याख्यानें व मासिक किंवा पाक्षिक चर्चामंडळ सुरू करण्यांत यावें.

(५) यंदा २५० पर्यंत सभासद नोंदणी करण्यांत यावी. त्यासाठी का. मं. च्या प्रत्येक सभासदाने किमान ५ सभासद तरी नोंदविलेच पाहिजेत. या जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्याने किमान २५ सभासद नोंदवावे.

वरील कार्यक्रम निश्चित झाल्यावर यासाठी आवश्यक तो निधि कसा मिळवावा यासंबंधी चर्चा झाली व तदनंतर जुन्या का. मं ने नव्या का. मं. स अधिकारसूत्रें सोपविलीं.

शाखेच्या कार्यकारी मंडळाची सभा

ता. ७ जुलै १९५३ रोजीं का. मं. ची सभा होऊन पुढील निरनिराळ्या समित्या नियुक्त करण्यांत आल्या. (१) प्रकाशन समिति:—सर्वश्री. के. डी. देशपांडे, व्यवहारे व निजसुरे (२) चर्चा-मंडळ व व्याख्यानें:—श्री. देवधरे, अंबाडकर व तांबी (३) परीक्षा समिति:—श्री. फडके, शकुंतलाबाई दिवाणजी, मदनलाल भट्ट, व्यवहारे व सुरेश ढोलके.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यंदाचे शाखेचा वार्षिकोत्सव सप्टेंबरमध्ये साजरा करण्यांत यावा असें ठरलें व त्यानंतर खालील ठराव संमत करण्यांत आले.

(२) मध्यप्रदेशांतील मराठी-भाषी विभागांतील मराठी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय संघराज्यभाषेचें—हिंदीचें ज्ञान—व्हावें या हेतूने मराठी विभागांतील सर्व दुय्यम शिक्षण संस्थांतून हिंदी विषय शिकविणारा शिक्षक नेमण्याचें धोरण म. प्र. सरकारने अंमलांत आणलें त्याबद्दल ही सभा म. प्र. सरकारचें अभिनंदन करते. परंतु हिंदी विषय शिकविणारे शिक्षक नेमत असतांना त्यांच्या मराठी भाषेंतील प्राविण्याचा विचार करण्यांत येत नाही, हें आश्चर्यजनक आहे. मराठी विभागांतील दुय्यम शिक्षण मराठी माध्यमांतून दिल्या जातें, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे अशा विद्यार्थ्यांना हिंदी सुद्धा मराठी माध्यमांतून शिकविण्यांत आली पाहिजे हें स्पष्ट आहे. या दृष्टीने अशा नेमणुका करतांना हिंदी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना तो मराठी माध्यमांतून शिकवितां येईल इतकें तरी किमान मराठीचें व मराठी वाङ्मयाचें ज्ञान असणें आवश्यक समजण्यांत यावें व तो विदर्भ सा. संघाची 'साहित्य-विनीत' परीक्षा उत्तीर्ण झालेला असल्यास ती त्यांची विशिष्ट लायकी समजण्यांत यावी, अशी ही सभा राज्यसरकारला विनंती करते.

(२) ता. १५ आगष्ट १९५३ पासून मध्यप्रदेशांत मराठी व हिंदी ह्या राजभाषांचा वापर राज्य-कारभारांत सुरू होणार आहे. त्यासाठी म प्र. सरकार राज्यकारभारविषयक शब्दकोश तयार करवून घेत आहे. परंतु भारत सरकाराने राज्यकारभारांत वापरावयाचा पारिभाषिक शब्दांचा एक कोश तयार करवून घेतला असून त्याचा वापरहि सुरू केलेला आहे. अखिल भारतांत राज्यकारभारांत सुसूत्रता राहण्याच्या दृष्टीने असा अखिल भारतीय स्वरूपाचा शब्दकोश असणें व सर्व राज्यघटकांनी तो प्रमाणभूत मानणें आवश्यक आहे. म्हणून ही सभा म. प्र. सरकारला अशी विनंती करते की भारत सरकारने तयार केलेला राज्यकारभारविषयक 'शब्दकोश'च प्रमाणभूत मानून त्याचाच या राज्यांत वापर सुरू करावा.

म. बा. देवघरे, चिटणीस
वि. सा. संघ, अमरावती

खुलासा

आमच्या गेल्या अंकांतील 'हिमालयावरील स्वारी' या स्फुटांत, तेनसिंगने 'एवरेस्ट' वर अमेरिका, नेपाळ व ब्रिटन यांचीं निशाणें लावलीं असा उल्लेख आहे; वास्तविक 'अमेरिके'ऐवजी 'संयुक्तराष्ट्र परिषदे'चा उल्लेख असायला हवा होता. झाली ही केवळ नजरचूक आहे असें वाचकांना आमचें सांगणें आहे. कांही वाचकांना असें वाटलें की, "अमेरिका आणि संयुक्तराष्ट्र परिषद यांतील अभेद आम्हाला सूचित करायचा होता." पण आमच्या मनांत तसें कांही नव्हतें.

—संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

तुमचें प्रकाशन साहित्यप्रेमी वाचकांना
सादर करण्यासाठी

युगवाणींत जाहिराती द्या

लेखक, प्रकाशक व विक्रेते यांनी
आपल्या नवीन प्रकाशनांच्या जाहिराती
युगवाणींत अवश्य द्याव्या.

जाहिरातीच्या दरांसाठी

**व्यवस्थापक, युगवाणी,
विदर्भ साहित्य संघ-कार्यालय,
उत्तर अंबाझरी रोड, नागपूर १.**

या पत्यावर लिहा.

हें मासिक श्री. **पां. ना. बनहट्टी** यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. **ना. रा. शेंडे,** सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या व्रतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमानें सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ